# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८९**

MAHMAR 19359/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सहावे / अंक २ / जानेवारी २००५

## संपादकीय

### त्सूनामी लाटा आणि प्रश्नांची बादळं

त्सूनामी लाटांचा प्रकोप आणि हजारोंनी होणारे मृत्यू या २६ डिसेंबरच्या अस्मानी संकटाने स्वाभाविकच गेले पंधरा दिवस सर्व माध्यमे या विषयावर सातत्याने लिहिताना, दाखवताना दिसताहेत. ९३ सालचा किल्लारीचा भूकंप, नंतरचा 'भूज'चा भूकंप... सारे काही भयकंपित करणारे.

या बातम्यांमध्ये अरबी महासागरावरील पश्चिम किनाऱ्याबाबत काही उलटसुलट बातम्या होत आहेत. काही तज्ज्ञ मुंबई बुडाली तर किती नुकसान होईल याची भाकिते व्यक्त करण्यात स्वत:ची निष्णाणता दाखवीत आहेत तर काही अगदी विरोधात मुंबईला त्सूनामीची भीती नाही असे छातीठोकपणे सांगताहेत. ८४ साली डिसेंबरला भोपाळचे हत्याकांड झाल्यावर 'पुढचा नंबर ठाण्याचा' या विषयावर अनेक तज्ज्ञांनी रकाने भरले होते. पण सुदैवाने अद्याप काही विपरित घडले नाही. त्सूनामीबाबत वर्तवली जाणारी भाकिते ही माणसाच्या मनात कायम व्यापून असणारी भीती व्यक्त करतात. मोठाली मानली जाणारी वृत्तपत्रेही मथळ्याच्या बातम्यांमध्ये मुंबईसह सर्व उपनगरे धोक्यात असं छापताना पाहिली की सर्वाधिक खपाच्या स्पर्धेसाठी खेळले जाणारे डावपेचच आहेत की काय असं वाटायला लागतं. 'काहीतरी सनसनाटी' याची ही अनामिक ओढ आम्हाला कुठे नेणार आहे हे न समजणारी आहे.

लातूर किल्लारी परिसरातील हजारो माणसे अद्यापही शासनाच्या तथाकथित मदतीपासून आपण वंचित आहोत असं सांगताना जनतेने दिलेली मदत गेली कुठे असा अविश्वास दाखवणारा प्रश्न मनात चुकचुकतोच ! ज्यांचे सर्वस्व गेले त्यांच्या नावाने गोळा होणारी मदत त्यांच्यापर्यंत पोहचविणे हा किमान मानवी धर्म मानायला हरकत नाही. त्सूनामीच्या पार्श्वभूमीवर आर्थिक मदत गोळा करणारी दुकाने थाटली गेली हे खरे, पण ही मदत त्यांच्यापर्यंत जायला हवी, सर्वच पैसा, हडप होत नसेल असे मानले तरी काहींना अतिमदत आणि काहींना अजिबात नाही असं विषम चित्र दिसायला नको.

डिसेंबर अखेर आणि दारूचे बळी हा कित्येक वर्षांचा नियम आहे. दारु पिऊन मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत दिली जाणार अशी बातमी आहे... कशासाठी हा अपव्यय? अस्मानी सुल्तानी संकटं येतात, जातात... पण मनात नोंदली जाणारी निरीक्षणं अधिकाधिक अस्वस्थ करत जातात. कोणताही दोष नसताना इहलोकीची यात्रा संपवावी लागलेल्या हजारो अनाम बांधवांना श्रद्धांजली !!




# दिशा

वर्ष सहावे / अंक २ / जानेवारी २००५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री संत एकनाथ महाराज | शं. बा. मठ | ३ |
| २) | डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो. दि. पराडकर | ९ |
| ३) | भगिरथ प्रयत्न | अ. ह. पटवर्धन | १२ |
| ४) | वास्तुकलेचे आणखी काही नमुने | सौ. मंजिरी दांडेकर | २२ |
| ५) | भगवद् गीता - जशी आहे तशी | आशा भिडे | २५ |
| ६) | उर्मिला एक उपेक्षित व्यक्तिमत्त्व | सौ. मालती देवधर | २९ |
| ७) | मराठी सिनेमा बदलतोय | नेहा उदय फडके | ३२ |
| ८) | 'मानवी आरोग्य' आणि 'आहारशास्त्र' या विषयावर ठाण्यात झालेली राष्ट्रीय परिषद | अमित रमेश भोईर | ३५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३८ |
| १०) | उल्हास खाडीतील प्रदुषण सद्यस्थिती व उपाय | | ४० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री संत एकनाथ महाराज

*श्री. शंकरराव मठांचे संतचरित्र विषयक लेख ही वाचकप्रिय ठरलेली लेखमाला. या लेख मालेतील एकनाथ महाराजांवरील लेख येथे देत आहोत. - संपादक*


'ज्ञानाचा एका आणि नामाचा तुका' म्हणजे ज्ञानदेवाचे एकनाथ व तुकाराम. अशी वारकऱ्यांची पारमार्थिक धारणा असलेली आढळते. ज्ञानदेव आणि एकनाथ यांचे लौकिक जीवन, काव्य रचना, परमार्थजीवन, आणि संप्रदाय संवर्धन या स्तरावर या दोन संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व यांचा समन्वय आढळतो.

### नाथांचा जन्म

संतांची भूमी म्हणून वाखाणलेल्या मराठवाड्यातील पैठण (प्रतिष्ठान) या गावी नाथांचा जन्म इ. स. १५३३ या वर्षी झाला. प्रतिष्ठान हे एक अत्यंत प्रतिष्ठित नगर होते. शालिवाहन किंवा आंध्रभृत्य राजाची ती राजधानी होती. पैठण हे ज्ञान व कला यांचे केन्द्र होते. पंढरपूर हे धर्मपीठ तर पैठण हे ज्ञानपीठ. अशी पैठणभूमी नाथांचे जन्मस्थान होती, तसेच पुढील काळात तीच कर्मभूमीही झाली.

### बालपण

नाथांचे बालपण आजोबा व आजी यांच्या छत्राखाली सुखात गेले. वयाच्या सातव्या वर्षी नाथांची मुंज झाली. त्यांना सगळ्या धार्मिक कृत्याची आवड होती. आणि गुरु कृपेने नाथांचे जीवन उजळून निघाले. त्यांचा स्वभाव मोकळा, परोपकारी, सहज प्रवृत्ती व वाणीत गोडवा होता.



### सद्‌गुरुची भेट

सद्‌गुरुच्या भेटीबद्दल साधकांच्या मनातील आर्तता पराकोटीला गेली की ते आपणहून शिष्याला भेटतात. नाथ एकदा शंकर मंदिरात ध्यानस्थ बसले असता 'देवगिरीला श्री जनार्दन स्वामीकडे जा व त्यांच्याकडून गुरु मंत्र घे' अशी प्रेरणा झाली. ते तडक देवगिरीला गेले. त्यावेळी नाथांचे वय अवघे बारा वर्षाच होते. नाथांची दृढ श्रद्धा पाहून स्वामींनी त्यांना शिष्य म्हणून स्वीकारले. नाथ गुरु सान्निध्यात सहा वर्षे राहिले. सहा वर्षाच्या कठोर साधनेनंतर त्यांना पर्वतावर ईश्वर साक्षात्कार झाला. प्रपंचात राहून परमार्थाचा अनुभव कसा घेता येतो याची शिकवण स्वामींनी आपल्या आचरणाने नाथांना दिली. नाथांना गुरु मुखातून ज्ञानेश्वरी ऐकण्याचा लाभ झाला.

### जनार्दन स्वामी

जनार्दन स्वामी हे एकनाथांचे सद्‌गुरु होत. त्यांनी शिष्य म्हणून नाथांचा स्वीकार केला. त्यांच्यावर अनुग्रह करून गुरुकृपा केली. त्यांचे सारे जीवन अंतर्बाह्य उजळून टाकले. त्यांच्या ठायी साहित्य निर्मितीची प्रेरणा केली. दोघांची शरीरे भिन्न पण मने अभिन्न. श्री जनार्दन स्वामींचा काळ इ. स. १५०४ ते १५७५. ते चाळीसगावचे राहणारे. त्यांचे गुरु साक्षात् दत्तात्रय. चांद बोधले त्यांचे गुरु असावेत असे काहींचे म्हणणे आहे. जनार्दन स्वामी देवगिरी येथे

अधिकारी होते. यवनांच्या सेवेत असूनही त्यांनी स्वधर्म निष्ठा कधी ढळू दिली नाही. ते दत्तभक्त असल्याने दर गुरुवारी गडावरील कामाला सुटी असे.

जनार्दन स्वामींनी नाथांना आत्मज्ञानामृत पाजले. दत्त दर्शन व दत्त अनुग्रहाची जोड दिली. गडावरच गुरु आज्ञेने श्रीकृष्ण उपासनेचे अनुष्ठान केले. सहा वर्षे ध्यान धारणा व समाधी या गोष्टीत काल व्यतीत केला. एकदा काळ सर्पाने विळखा घातला. नाथांचा स्पर्श होताच त्याची क्रूरता मावळली. त्याने नाथांच्या मस्तकावर आपला फणा धरला.

आम्हा डंखू आला काळ ।
तव तो काळचि झाला कृपाळ ।

असे नाथांनी लिहून ठेविले आहे. तीर्थयात्रा करुन झाल्यावर गुरुच्या आज्ञेने त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला.

## नाथांचा गृहस्थाश्रम

नाथ हे गृहस्थाश्रमाचे मूर्त रूप होते. नाथांना अत्यंत अनुरूप गुणी पत्नी लाभली. गृहिणी सचिवः सखीमिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौः । अशी गृहिणी ज्यांना लाभते त्यांचा संसार हा सुखाचा झाला पाहिजे. नाथ शांतीब्रह्म, पत्नी गृहकृत्यात दक्ष व वाकबगार, उदार मनस्क व प्रेमळ, धर्मकार्यात मनापासून रुची घेणारी, अशी पत्नी सद्गृहस्थास मिळाली तर संसार ब्रह्मरूप होतो.

नाथानी चोरांचाही पाहुणचार केला. त्यांची प्रवचने ऐकून एका वेश्येला उपरती झाली. काशीची कावड, रामेश्वरला नेताना वाटेत तृषार्त गाढवाच्या तोंडात त्यांनी गंगाजळ घातले. ब्राह्मण आले नाहीत म्हणून पितरासाठी केलेले अन्न त्यांनी अंत्यजाना वाढले. द्रव्यमग्न एका वाण्याला स्वतः त्याच्या दुकानी जाऊन विष्णु सहस्त्रनामाच्या एकेक श्लोकाची संथा दिली. सर्वभूत हितरत म्हणजे काय ते नाथा पासून समजून घ्यावे. प्रपंच साधून परमार्थ करावा हे नाथानी आपल्या आचरणाने दाखवून दिले.

प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून लोकांना परमार्थ प्रवृत्त करणाऱ्या शांतिब्रह्म नाथ महाराजांनी मन बुद्धी पांगुळते ही जी एक साधकाची अवस्था होते ती सावरण्यासाठी गुरु बोधाचा बळकट आधार देऊ केला आहे. पारमार्थिक वाटचालीत हा आधार अत्यंत उपयुक्त ठरतो. प्रपंचात अहंकाराने पंगुत्व येते आणि परमार्थात अज्ञानाने त्याचे परिणाम जाणवतात. सारांश, प्रपंचात दुःख परमार्थात उदासीनता येते. दोन्हीकडे लक्ष लागत नाही.

नाथानी संसाराचा त्याग न करता संसारात त्याग केला. 'पद्मपत्र मिवांभसा' असा त्यांचा संसार होता. त्यांना संसाराचा पाश नव्हता.

## नाथांची भक्ती

एकनाथी भागवत भक्तिरसाचा अथांग सागर आहे. पीयूषाचा अर्णव आहे. भागवताच्या एकादश स्कंधावर टीका लिहून एकनाथानी भक्तीचा प्रसार केला. तसेच कीर्तन प्रवचन पुराण कथन द्वाराही प्रचार केला. संसार पारमार्थिक करून उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

नाथांच्या उत्कट प्रेमाने आकर्षिले गेलेले भगवान श्रीकृष्ण स्वतः त्यांचे घरी श्रीखंड्याच्या रूपे सेवक झाले. गंगेच्या कावडी भरून आणणे, चंदन उगाळून देणे, पूजेची तयारी करणे आणि इतर पडेल ती कामे श्रीखंड्याने केली.

नाथांनी ज्ञानदेवाच्या गळ्याभोवती वेढली गेलेली अजान वृक्षाची मुळी सोडविली. आळंदीचा पुनरुद्धार केला. ज्ञानदेव समाधी दर्शन सुलभ केले. पंढरीच्या वारीला उधाण आणले. ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. प्रक्षिप्त आणि अपपाठ दूर करून शुद्धप्रत तयार करणारे एकनाथ हे मराठीचे पहिले संशोधक आहेत.

## नाथांची भजने

नाथांच्या वेळचा काळ मुस्लिम सत्तेचा, त्यामुळे देश परतंत्र होता. भारतीय समाजाला मृतवत् मालिन्य आले होते. समाजात लोकांचे राष्ट्रशील नष्ट झाले होते. त्याचा परिणाम म्हणजे हिंदू लोकच नीती व धर्माची हानी करून समाजघातक कृत्ये करू लागले होते. त्यामुळे समाजात समाजद्रोही, धर्मद्वेषी, स्वजनद्रोही लोकांचा प्रादुर्भाव सर्वत्र वाढला होता. पंडिताना पांडित्याचा अभिमान, धर्म मार्तण्ड लोभाने अंध, संन्यासाश्रम गोसावी इत्यादि ही समाजातील सोंगे बनली होती.

त्यावेळी नाथानी भजनाद्वारे समाजाला मार्गदर्शन करून समाजाची उन्नती केली. समाजाचे सूक्ष्म निरीक्षण करून नैतिक शुद्धतेवर आधारलेली भक्ती व सर्वाभूती समता आणि सद्‌गुरुला श्रेष्ठ उपदेश नाथांनी केला. आजही या भजनांची गरज आहे. नाथांनी समाजात नैतिक व धार्मिक उन्नतीचे कार्य करून लोकात समाजहित व स्वहिताची जाणीव करून दिली. त्यामुळे नाथांची भजने अजरामर झाली आहेत. मन बुद्धी चित्त व अंतःकरण शुद्ध व पवित्र राहण्यासाठी नामस्मरण आणि कीर्तन हे एक साधन असल्याने ते साधन नाथांनी समर्थपणे हाताळले.

## वारकरी कीर्तन संप्रदाय

नाथांनी वारकरी कीर्तन समाज मनात रुजविले. निरूपणात सगुण चरित्रे वर्णावयाचा आग्रह धरिला. निरभिमानाने सत्संग भक्ती, गुरुकृपा हे विषय निरूपणात यावेत असे त्यांनी म्हटले. **भक्ती ज्ञान विरहित गोष्टी इतरांनी कराव्या । प्रेमळ भावे वैराग्याच्या युक्ती विवराव्या ।** ही नाथांची सूचना कीर्तनाचे सत्व आहे. कीर्तन हे कीर्तनच हवे. विशुद्ध भावानुभाव त्यात हवा. निरूपण रसाळ हवे. शुष्क काथ्याकूटात कीर्तन अडकू नये. मनापासून समाजाला वैराग्य शिकवावे. वैराग्य म्हणजे समंजसपणाची जाणीव, मनात श्रीहरीची मूर्ती ठसवता आली पाहिजे. कीर्तनातला भक्ती रस बाधित होता कामा नये. ही संतांच्या घरची कीर्तन मर्यादा आहे.

मनाची प्रसन्नता हेच विठ्ठलाचे रूप आहे. या साठी हरिकथा हवी. समाज शिक्षणाचे ते एक प्रभावी साधन आहे. देवाच्या ठायीचे प्रेम कीर्तनात आपोआप पाझरते. तो भक्ताना आलिंगन देतो. नाथांनी कीर्तनात भारूड आणले, गौळणी आणल्या, समाजजीवनातल्या सगळ्या गोष्टी आणल्या. बारा बलुतेदारांना कीर्तनात आणले. या सर्वातील एक मर्म त्यांनी सांगितले ते म्हणजे आपण आपल्याला आधी ओळखा मग समाजसेवेचा वसा घ्या. आपल्या विकारांची छिद्रे आधी बुजवावीत. समाज सेवेत उतरताना आपले कर्तव्याचे हात आणि सेवेचे पाय स्वच्छ असावेत. मगच आपल्याला सामाजिक पापा बद्दल बोलावयाचा अधिकार पोहोंचतो.

**कीर्तन हे पूजा कीर्तन हे भक्ती । कीर्तन होय मुक्ती सर्व जीवा ।**

नाथांच्या कीर्तनाचे सूत्र एकात्मतेचे प्रतीक आहे. सारे एक होऊन हरिकथा अनुभविणे ही केवढी थोर राष्ट्रीय एकात्मता आहे. त्यामुळे माणूस माणसाच्या देवघरात बसतो. तो सुसंवादी होतो. भक्तीतील पावनत्वाची शक्ती प्रत्यक्ष कीर्तनात अवतरते. म्हणून कीर्तन हे श्रेष्ठ आहे.

कीर्तनात गायन वादन नर्तन अभिनय हे सारे असते. साऱ्या विद्या आणि कला कीर्तनात गुण्या गोविंदाने नांदतात. त्यामुळे माणूस संसारात रसिक व वागण्यात वत्सल होतो. त्याच्या जगण्याला रुपेरी कडा असते. लोककल्याण्यासाठी तो झटतो. संतांच्या कीर्तनातून संतत्वाची स्फूर्ति मिळते. ऐसा कीर्तन महिमा । एका जनार्दनी उपमा । नाथानी आपला हा अनुभव सर्वांना मुक्तपणे दिला. असा भागवत धर्माचा विस्तार केला.

**हरी पंडित**

नाथांना समाज टीकेला तोंड द्यावे लागले. हा सहन करावा लागणारा विरोध घरा बाहेरच्या प्रतिष्ठित समाजाकडून झाला तसाच तो प्रत्यक्ष घरातूनही झाला. एकुलत्या मुलाला हरिपंडिताला नाथांचे मराठी प्रेम आवडत नव्हते. तो संस्कृत अध्ययन केलेला निपुण पंडित होता. आपल्या वडिलांनी मराठीतून लेखन करणे ही भूमिका हरि पंडिताला मान्य नव्हती. तो घर सोडून काशीला निघून गेला. काशीला जाऊन नाथांनी त्याला परत आणले.

आपण मराठीतून पुराण कथन करू नये व परान्न घेऊ नये या अटी मान्य केल्यावरच नाथांबरोबर तोपैठणला आला. या अटी नाथांनी मान्य केल्या.

**नाथांची महती हरि पंडितला कळली.**

एक वृद्ध महिला नाथाना भोजनासाठी विनवू लागली. तिच्या भावना पाहून नाथ पंडिताला म्हणाले तू यातून मार्ग काढ. तू स्वतः तेथे स्वयंपाक करून दोघे जेवल्यास तिला समाधान होईल. ही गोष्ट पंडिताला पटली. त्याने स्वयंपाक केला. दोघेही जेवावयास बसले. त्या बाईने केलेले पदार्थही नाथांनी खाल्ले. हरि पंडित विथरला. लगेच पत्रावळी काढून टाकावयास निघाला. तो काढतो तसे त्याच्याखाली पत्रावळ असावयाची. हजार पत्रावळी काढल्या. आपल्या वडिलांची थोरवी त्याच्या ध्यानात आली. अशा लोकांसाठी वडील मराठीतून का प्रवचन करतात हे ध्यानी आले. मराठीत ज्ञान सांगणे ही गरज आहे हे त्यांनी ओळखले. त्यानी संस्कृतची आग्रही भूमिका सोडून दिली.

**लोक गीतांचा आश्रय**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संरचनेत संत परंपरेचे स्थान काही आगळेच आहे. भक्ती संप्रदायाची मूलतत्त्वे सोप्या भाषेत सांगून संतानी विवेकाची सदाचाराची आणि समतेची शिकवण दिली. परंतु संतांची ही शिकवण समाजात रुजविली गेली तीत महाराष्ट्रातील लोक भूमिकांनी. समाजाला काही सांगणारा, शिकविणारा आणि मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा असा एक वर्ग बऱ्याच काळापासून महाराष्ट्रात नांदत होता. वाघ्या, मुरळी, भराडी, गोंधळी, भालदार, चोपदार, कोल्हाटी, मानभाव, दरवेशी, सखदा, बाळ संतोष, वासुदेव, पोतराज अशा अनेक विध लोकभूमिका समाजात वावरत होत्या. त्या लोक भूमिकांचा लोक संपर्कही फार मोठा होता. राजाश्रयापेक्षा लोकाश्रयावर या भूमिका जगत होत्या. समाजातील सर्व थरात या लोकभूमिका लोकप्रिय झाल्या होत्या. गावगाड्यात वावरणाऱ्या ह्या लोकभूमिका म्हणजे ग्रामीण समाजाचे आकर्षण होते. मराठी संतानी प्रथम या लोकभूमिकांचा पुरेपूर उपयोग करून घेतला. या लोकभूमिकामधून रुपकात्मक पद्धतीने तत्त्वज्ञानाची मांडणी करीत मराठीमध्ये भारुडांची निर्मिती करण्यात आली. लोकभूमिकांच्या माध्यमातून बोली भाषेत आपले विचार मांडून ते खेड्यापाड्यापर्यंत नाथांनी पोचविले. अध्यात्म आणि नीती या संकल्पनांचे भारूडाद्वारे लोक शिक्षण देऊन उपेक्षित लोकांची सामाजिक उंची वाढविली.

मराठीत भारुडांची प्रथम निर्मिती केली ती संत ज्ञानदेवांनी. भारुडांची लोकप्रियता मिळवून दिली ती संत एकनाथांनी. नाथांच्या भारुडांची संख्या, त्यांचे वैशिष्ट्य विविधता आणि समाजातील सर्व थरातून झालेला प्रसार लक्षात घेता हा वाङमय प्रकार नाथांनी किती बहुरूप केला आहे हे लक्षात येते. भारुडातून डोकावणाऱ्या नाथांच्या लोकोन्मुख वृत्तीची साक्ष पटते.

**नाथांचे साहित्य**

संत एकनाथांनी आपल्या सहासष्ट वर्षांच्या जीवनक्रमात विपुल आणि विविध प्रकारची वाङमय निर्मिती केली आहे. इथे त्यानी लिहिलेल्या ग्रंथाची संक्षिप्त सूची पाहूनही आपले मन थक होईल. आपण हे सारे कधी काळी अवलोकन करू तर आपल्याला नाथांची विद्वत्ता

ध्यानात येईल. १) पांच स्फुट प्रकरणे -[ १) स्वात्म सुख २) शुकाष्टक ३) हस्तामण्क ४) आनंदलहरी ५) चिरंजीव पद.] २) चतु:श्लोकी भागवत ३) रुक्मिणी स्वयंवर ४) अभंग गाथा ५) एकनाथी भागवत (३१ अध्यायी) ६) भावार्थ रामायण - युद्धकांडापर्यंत ७) स्फुट कविता ८) आध्यात्मिक प्रकरणे ९) चरित्रपर प्रकरणे १०) आख्यानपर प्रकरणे ११) आख्यान काव्य - रुक्मिणी स्वयंवर १२) भाष्यग्रंथ - भागवत , एकादश स्कंध इत्यादी.

तसेच अभंग, भारुड यापासून भागवत, भावार्थ रामायण इथ पर्यंत नाथानी काव्य सृष्टी निर्माण केली. नाथ भक्तिरस हा काव्यात्मा मानतात. नाथ हे भक्तियोगी कवी आहेत तीच त्यांची काव्य दृष्टी. एकनाथी भागवत हे महाराष्ट्र संस्कृतीचा एक अमोल ठेवा आहे. मूळ संस्कृत भागवत पुराणाच्या एकादश स्कंधावरील नाथभागवत ही मराठी टीका आहे. तिचे लोकोभिमूख स्वरूप ध्यानात घेतले असता एक्नाथ हे खऱ्या अर्थाने लोकनाथ ठरतात. मूळ एकादश स्कंधात १३६७ संस्कृत श्लोक आहेत व त्यावरील एकनाथी टीका १८,७७४ ओव्यांची आहे. नाथ भागवत ही नाथांची वाङ्मयीन मूर्तीच ठरते.

### विठ्ठल भक्ती

नाथांनी भागवत धर्माची ध्वजा उंच उभारली. भागवत धर्म हा पारमार्थिक क्षेत्रात एक प्रकारची समता निर्माण करणारा धर्म आहे. ईश्वराची सगुण रूपात केलेली भक्ती, आचार विषयक नियमाचे पालन, आणि सर्वाभूती समभाव ही भागवत धर्मातील काही मूल तत्वे आहेत. या तत्वांचा प्रत्यक्ष आचार विचारात प्रभाव पडण्याच्या दृष्टीने श्रीकृष्णाचे एकरूप जे विठ्ठल स्वरूप ते महाराष्ट्राचे लाडके दैवत होऊन राहिले आहे.

एकनाथांच्या घरी भानुदासांच्या वेळेपासून विठ्ठलभक्ती चालू होती. माझ्या वडिलांचे दैवत । कृपाळू हा पंढरिनाथ । ते त्याला विजय विठ्ठल म्हणत. सगुण निर्गुण तेथेचि आवरण । ब्रह्म, सनातन पंढरिचे । चारीवेद सहाशास्त्रे आणि अठरा पुराणे याना - चाळा लावणारे परिपूर्ण परमात्मरूप पंढरीस उभे आहे. असा व्यापक अर्थ नाथ सांगतात.

जन्मोजन्मी आम्ही बहुपुण्य केले । मग या विठ्ठले कृपा केली । संसारी जन्मोनी झालो त्याचा दास । माझा तो विश्वास पांडुरंगी । आणिका दैवासी नेणे माझे चित्त । गोड गाता गीत विठोबाचे ।

सगुण साकार सोवळे परब्रह्म विठ्ठलाच्या रूपात समोर विटेवर उभे असल्याच्या आनंदात एकनाथांचे अवघे पारमार्थिक भावजीवन सुस्नात होऊन निघाले.

### नाथ व समाज विचार

महाराष्ट्राच्या संत परंपरेत ज्ञानदेव, तुकाराम, नामदेव, रामदास आणि एकनाथ या प्रमुख संत धारा आहेत. ज्ञानदेव ही माउली, नामदेव भक्तीचा जिव्हाळा, तुकाराम भागवत धर्माचा कळस, रामदास प्रखर राष्ट्रधर्माचे प्रवर्तक, तर एकनाथ हे भागवत धर्माचे खांब आहेत.

नाथांची साहित्य संपदा विपुल आहे. भारुडाच्या माध्यमाद्वारे त्यांनी समाजातल्या सर्व सामान्य आणि गाळातल्या लोकांच्या मनात जागृती निर्माण केली. तसेच ज्ञानी, पंडित, साधू, बैरागी, संन्यासी, पुरोहित वर्ग यानाही त्यांच्या उणीवा यथार्थपणे लक्षात आणून दिल्या. ढोंगी विद्वानांचा बुरखा फाडून त्याना परमेश्वराच्या अंतिम चरणाकडे जाणारी वाट दाखविली. त्यांचे समग्र साहित्य या दृष्टीने मार्गदर्शक ठरले आहे.

नाथांच्या वेळी लोक परकी सत्तेच्या खाली भरडले जात होते. अध्यात्मापासून वंचित होऊन भलत्याच गोष्टींच्या मागे लागले होते. राजकीय, सामाजिक जीवन अस्थिर झाले होते. त्याचे प्रतिबिंब लोक व्यवहारात उमटले

होते. देव, देवस्की, गंडे, धुपारे या कडे लोक वळले, देवाला कौल लावणे, पशूबळी देणे इत्यादी. भक्तीची आंतरिक जाणीव नसलेला केवळ आपल्या पोटापाण्याचे साधन म्हणून देवाला वापर करणाऱ्या लोकाना अप्रत्यक्षपणे रसातळाला जाणाऱ्याना नाथानी योग्य मार्गदर्शन केले. त्यांचे काव्य वाङ्मय म्हणजे लोकशिक्षणच होते. समाज मनात आत्मतेज, कर्तव्याची जाणीव, खरी ईश्वर निष्ठा निर्माण व्हावी ही अति तळमळ त्यांच्या मनात होती. या अर्थाने नाथ एक समाज सुधारक होते. गृहस्थाश्रम व आध्यात्म यांची उत्कृष्ट सांगड घालणारा एक आदर्श त्यानी समोर ठेविला. भागवत धर्म हा भूतदया, मैत्री, नम्रता मानणारा आहे. माणसाला माणुसकी शिकविणारा समाजात परस्परांविषयी प्रेमभाव निर्माण करून समाजाला वर काढणारा हा सामाजिक धर्म आहे अस सांगून सर्वाभूती भगवंत पाहणारा हा भक्तिपंथ आहे. समतेचा व प्रेमाचा मार्ग आहे असे प्रतिपादन केले.

असा थोर महात्मा फाल्गुन वद्य षष्ठी रोजी शके १५२१ ला त्यानी स्वतःला ईश्वरार्पण केले. त्यानी केलेले उद्बोधन चिरंतन काळपर्यंत आम्हाला मार्गदर्शक ठरेलं. या थोर महात्म्याला आमचे शतशः प्रणाम.

इति अलम् ।

**शं. बा. मठ**

६, कुमार अशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

## १२ जानेवारी २००५



राष्ट्रीय युवक दिन ! भारत मातेला ललानभूत ठरलेले व्यासंगी तत्वज्ञ विवेकानंद यांच्या जयंतीचा दिवस. हा दिवस राष्ट्रीय युवक दिन म्हणून पाळला जावा ही यथा योग्य कल्पना स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांची.

दिशाहीन अवस्थेत सापडलेल्या शिक्षित युवकांनी आदर्श समोर ठेवावा तो स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा उत्तुंग कर्तृत्वांचा.

त्यासाठी वयाने व मनाने युवावस्थेत असणाऱ्या प्रत्येकाने विवेकानंदांचे विचार समजावून घ्यावेत, आचरणात आणावेत. त्यामुळे जीवनात प्रयोजन निर्माण होईल व देशाला उज्ज्वल भविष्य प्राप्त होईल.


**- चिंतन**

*२००५ साल सुरू झाले तेव्हां शालिवाहन शक १९२६ होते. ९ एप्रिलला शालिवाहन शकांतील तारणनाम संवत्सर संपेल. ९ एप्रिल वर्षप्रतिपदेचा दिवस आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक. या वर्षी ९ एप्रिल पासून पार्थिवनाम संवत्सर सुरू होईल !*

# डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन

**भाग ८**

राष्ट्रभाषा प्रचार समितीमध्ये सगळ्यांना आमच्या भा. ग. जोगळेकरांचं नाव माहिती होतंच. फार जुने प्रचारक होते आणि उत्तर भारतात राहिलेले होते. त्यामुळे पाठ्यक्रम समितीची (माझ्या हिंदीच्या इथल्या एकंदर तथाकथित लौकिकामुळे !) त्यांनी मला सदस्य करून घेतलं जोगळेकरांचा पिछलगु म्हणून मला घेतलं असावं ! इथले जे मुख्य प्रचारक होते. कांतीलाल जोशी ते म्हणाले, 'पराडकरजी, आपका नाम सुझाया गया, हमारे लिए यह बड़ी गौरवकी बात है।' मग आम्ही सदस्य म्हणून वर्ध्याला जाऊन राष्ट्रभाषेची काही पुस्तकं काढली. पुढे १९५६ सालामध्ये मुम्बई हिन्दी विद्यापीठाचे एक अधिकारी आले मला म्हणाले, 'तुम्ही आमच्याकडे याल का?' मी म्हटलं, 'मी नवीन असताना तुम्ही मला बोलावून चांगलं पद दिलंत तर काही लोकांना साहजिकच दु:ख होणार.' पण ते म्हणाले, 'ती काळजी सोडा. आमच्याकडे चांगलं हिंदी बोलणारं कुणी नाहीच.' चांगलं हिंदी बोलणं ही अजूनसुद्धा मला दुर्मिळ गोष्ट वाटते. आपल्या महाराष्ट्रात वापरलं जाणारं हिंदी परकी वाटतं, हे मोकळेपणाने मान्य केलं पाहिजे. त्याच्या उच्चारणाची पद्धत, शब्दांची रचना, वाक्यरचना हे सगळं अहिंदी वाटतं. माझ्या बाबतीत सुदैवानं ते नव्हतं. त्यामुळे माझ्या हिंदी व्याख्यानामध्ये किंवा रचनेमध्ये मराठीपण येत नसे. मराठी शब्दही येत नसत. कारण मी त्याबाबतीत जागरूक होतो. प्रचारवर्गात मी नियम केला होता. प्रत्येकानं ठरवावं की या वर्गामध्ये मला हिंदीशिवाय दुसरी भाषा येत नाही. यामुळं माझ्या वर्गात नेहमी दैनंदिन व्यवहारातही हिंदी बोलली जायची. कारण माझ्याजवळ प्रमाण किती आहेत, याच्यावर माझ्या हिंदीचं मोजमाप केलं जाणार नाही. बोलीभाषेचा गोडवा तुमच्या हिंदीत आला पाहिजे, याबद्दल मी सतत आग्रह धरीत आलो. विचार करायचा मराठीत आणि अनुवाद करायचा हिंदीमध्ये, असं केल्यास त्यात स्वाभाविकता रहात नाही. प्रचार समितीचा सदस्य म्हणून हिंदीच्या प्रचारकांशी संबंध जास्त येत गेले. १९५६ पासून मुम्बई हिन्दी विद्यापीठाशी संबंध, एकदा परीक्षाध्यक्ष



त्याला रजिस्ट्रार म्हणतात; नंतर उपकुलपती आणि नंतर २५ वर्षे कुलपती. मी का? 'एरंडोऽपि द्रुमायते' म्हणतो, त्याचं कारण माझ्याइतका अनुभव असलेला माझ्याशिवाय दुसरा कुणी त्यांना मिळला नाहीच ! दुबळा मनुष्यसुद्धा अनुभवाने प्रभावी ठरतो आणि मी इतका दुबळा नव्हतोच !

सगळ्या संस्थांचा मिळून १९६४ मध्ये (महाराष्ट्र राजभाषा, मुम्बई हिन्दी विद्यापीठ, राष्ट्रभाषा समिती) श्रीमाली केन्द्रात मंत्री होते, त्यांनी एकसंघ स्थापन केला. कशासाठी? त्यांच्यात एकवाक्यता यावी म्हणून. त्या संघाच्या स्थापनेपासून आजवर सतत कार्यकारिणीमध्ये असलेला सदस्य आहे. आमच्या मुम्बई हिन्दी विद्यापीठाचे माझ्यावर प्रेम आहे हे त्याचे कारण. प्रत्येक प्रचारसंस्थेचे २ प्रतिनिधी दिल्लीत पाठवले जातात. एक कार्यकारिणीमध्ये आणि एक व्यवस्थापन समितीमध्ये असे २ मिळून तो संघ स्थापलाय. त्या संघात मी इतकी वर्षं आहे हाही योगायोग आहे ! कारण प्रत्येक संस्थेच्या दर २ वर्षांनी निवडणुका होतात. त्या निवडणुकांमध्ये मला धोका पोचलेला नाही ! आणि त्यांनी दुसऱ्या कुणाचे नाव मी सांगूनसुद्धा टाळलंय!

१९६४ पासून मी असल्यामुळं सर्व लोकांना माझी माहिती असावी हे स्वाभाविकच आहे. माझी सोय अशी आहे की मला काही करावं लागत नाही !! आता त्या संघाचा सदस्य म्हणून निरनिराळ्या संस्थांच्या परीक्षांचे पाठ्यक्रम तपासण्यासाठी मी गेलो. या अ.भा. हिंदी प्रचार संस्था संघामुळे मी भारतातल्या पुष्कळ ठिकाणी गेलो. असा जात राहिल्यामुळे मी संघाचा सचिव झालो. मी त्यांना एकच सांगितलं की सर्वानुमतीनं होत असेल तरच हे करा; कुणाचाही विरोध असेल तर मला इच्छा नाही. पण या संघाच्या स्थापनेपासूनचे बाबू गंगाशरण सिंह (ते जयप्रकाशांचे अभि मित्र होते) त्यांनी माझ्यावर फार लोभ केला. अनेक गोष्टी त्यांनी मला करायला सांगितल्या. त्या मी केल्या. पुढे एकदा त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर मुलांचे वर्ष म्हणून जेव्हा साजरं केलं गेलं, तेव्हा प्रत्येक भाषेत बालवाङ्मयाचा परिचय करून द्या अशी योजना सरकारतर्फे होती. गंगाशरण सिंह असे होते की, हिंदीसाठी त्यांनी समाजवाद्यांच्या संस्थेचं अध्यक्षपद सोडलं होतं ! म्हणून त्यांच्यावरच्या लेखाचं शीर्षकही **'हिन्दीचे दधीचि'** असं मी दिलंय. तर त्यांनी मला मराठीतल्या बालसाहित्यावर 'Child-Literature' या ग्रंथात इंग्रजीत लेखन करून द्यायला सांगितलं. पंचतंत्रापासून आमच्याकडे कथेची जी परंपरा आहे. त्याचा उल्लेख करून त्याचे आजचे पाईक मराठीमध्ये कोण आहेत, याचा आढावा मी घेतला ! अर्थात् माझा फायदा असा की माझं वाचन वाढलं. गंगाशरण सिंह यांनी जाहीररीत्या असं सांगितलं की अखिल भारतीय पातळीवरचं जे काम आम्ही पराडकरांना सांगितलं ते त्यांनी केलं असे ते एकमेव गृहस्थ आहेत! त्यांच्या परिसंवादामध्ये साहजिकच मला बोलावे लागत असे. एकदा त्यांनी विषय निवडला 'अनुवाद'. हिंदी भाषेत मराठीमधून झालेले अनुवाद. हेही मला संस्थांच्या संबंधांमुळे उपलब्ध झालं. त्यामुळं त्या अनुवादावर लिहिलं. साहजिकच आतापर्यंत हिंदी साहित्याशी जरी मी इकडे संस्कृतच शिकवत होतो. माझा जो संबंध आला, त्याचा शेवट माझी अध्यापकीय जीवनाची२ वर्षे हिन्दी शिकवताना मला उपयोग झाला. तत्वत: मी एम्.ए.पी.एच्.डी. असल्यामुळे आणि हिंदीचा साहित्यरत्न असल्यामुळे माझ्या पात्रतेचा प्रश्न आला नाही. एकदा मुंबई हिन्दीविद्यापीठात आला होता पण त्याला परस्पर उत्तर दिलं गेलं.

गेली १०-१५ वर्षे 'भारतीय शिक्षण सत्य और तथ्य' या हिंदी मासिकाचं मी संपादन करतो आहे. संपादन करताना त्यात 'गुरुवाणी' या सदरामध्ये एखाद्या विषयाबद्दल, प्रचलित मताबद्दल त्यात मी लिहितो. आपल्याकडच्या मराठी साहित्यिकांच्या जयंती-मयंतीच्या निमित्तानेही लिहीत असतो. हा परिचय दुसरा कुणी करून देणार नाही. मला ते सहज उपलब्ध आहे. एक मात्र मी कटाक्षाने ठेवलं आहे की केवळ वाङ्मयाशी संबंधित असणं, हे संपादकासाठी चांगलं नाही. त्याचा खेळांशीही संबंध असला पाहिजे. माझ्या विद्यार्थीदशेमध्ये मी जसे बैठे खेळ खेळलो त्याचप्रमाणे हुतूतू, खोखो, आट्यापाट्या हे देशी खेळही शाळेच्या काळापासून मी खेळत आलो आहे. नंतर शिक्षण घेणं आणि पैसे मिळवणं हेच प्राथमिकता देऊन करावं लागल्यामुळे खेळांमध्ये काही करता आलं नाही. पण माझी या खेळांबद्दलची रुची कायम आहे. त्यामुळे बऱ्याच नंतरच्या काळात जेव्हा मी प्राचार्य म्हणून आलो तेव्हा खेळांबद्दल एक दृष्टिकोण मुलांपुढे ठेवणं साहजिकच खेळांमुळेही जीवन समृद्ध होतं, हा माझा दृष्टिकोण राहिला. या सगळ्याचा उपयोग माझ्या प्राचार्यपदाच्या कार्यकाळातही झाला. परंतु **'गुणा: दोषायन्ते'** हे आमच्या शिक्षण मंडळीने कसे सिद्ध केले, हे सांगितलेलेच आहे.

आजही TIMES मधलं SPORTS मी आधी वाचतो. विद्यार्थीदशेमध्ये म्हणजे शाळेत असताना मी दिवसच्यादिवस बुद्धिबळात घालवले आहेत. त्याचा उपयोग मला 'विलासमणिमञ्जरी' सारखं पुस्तक

मिळाल्यानंतर झाला. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत तिरुवेंगडाचार्य याने लिहिलेल्या या पुस्तकाचा परिचय मी करून देऊ शकलो. या पुस्तकात त्याने 'प्यादे मात' कशी असते ते लिहिलंय. बुद्धिबळात प्यादे मात असते. जोराजोरी असते, अनेक प्रकार आहेत. या साऱ्या प्रकारांशी परिचय असल्यामुळे साहजिकच लोकांना जरा आश्चर्य वाटतं. पण असं सारं असावं, असं मला वाटतं.

मी मघाशी म्हटलेल्या दिल्लीस्थित हिंदी संघाचा कोषाध्यक्ष होतो. त्यामुळे जवळजवळ महिन्याला एकदा मी दिल्लीला जात असे. सहा वर्ष सप्टेंबर किंवा मार्चमध्ये बैठक असल्यामुळे कॉलेजला रजा घेऊन मला प्राय: जावं लागत नसे. तेही योग्यच आहे! राजधानी एक्स्प्रेसचं तिकिट संघच देत असे. तुम्हाला सांगतो मी 'राजधानी'ने प्रवास ८४ रुपयात केलेला आहे. आता २-३ हजार तिकिट असेल. पण याचा परिणाम म्हणून लोकांचं प्रेम लाभलं तशी असूयाही माझ्या वाट्याला आली. माझ्या दैनंदिन उपजीविकेशी हिंदीचा संबंध नसल्यामुळं ज्यांना अपेक्षा होती, त्यांच्याशी संघर्ष आलेला नाही. 'आमदनी का विषय' नसल्यामुळे मला चिंताही नाही. हे उत्तर भारतात खरंही वाटत नाही. इतकी वर्ष मानधनाशिवाय कुलपती मी राहिलोय, याच्यावर त्यांचा विश्वास बसत नाही. हिंदीमधलं माझं सगळं हेवा वाटावा असंच आहे.

मी हिंदीचा प्रचार केला खरा, पण मुख्यत: हिंदीचा अभ्यास केला आणि अभ्यासाच्या जोरावर प्रचारामध्ये स्थान मिळवलं. त्यामुळे ही हिंदीच्या अभ्यासकाची प्रतिमा उभी राहिली.

हिंदीचा मला फायदा आणखी एक असा झाला की हिंदीतल्या मोठ्या मोठ्या माणसांशी माझा संबंध आला. ओळख फार झाली असं मी म्हणत नाही पण त्यांच्याजवळ बसून ते हिंदीबद्दल काय म्हणतात हे मला सहज जाणून घेता आलं. मैथिलीशरण गुप्त, दिनकर, बच्चन अशा व्यक्तींशी जो संबंध आला त्यामुळे मी आता 'विश्वचरित्रकोश' निघतो आहे त्याच्यामध्ये मी वरील साहित्यिकांवर तसेच हजारीप्रसाद द्विवेदी, देव हे जे कवी आहेत (ज्यांची नावंही इथे माहिती नसतात) त्यांच्यावर लिहिलंय. हे म्हणजे 'निरस्तपादपे देशे..'चाच प्रकार आहेत! या कोशाचा दुसरा खण्ड गेल्या पाडव्यालाच प्रकाशित झाला.

सहज बोलताना मी परवा म्हटलं हजारीप्रसाद द्विवेदी हे नाव कसं झालं? हजारी नावाची देवी आहे. त्या देवीच्या प्रसादामुळं हजारीप्रसादांचा जन्म झाला अशी त्यांच्या आईची धारणा होती. मला एका हिंदीभाषी माणसानं सांगितलं, अहो हे आम्हालासुद्धा माहिती नव्हतं! मी म्हटलं, कसं असणार? वाचायचं की माहिती होतं. विशेष काही नाही त्यात !! 'वाचाल तरच वाचाल' हे अध्ययन-अध्यापनाच्या क्षेत्रात खरंच आहे. म्हणून 'तुम्ही अजून वाचता का? हा प्रश्न निरर्थकच.'

**- मो.दि. पराडकर**

माहीम, मुंबई

आज माझ्या आयुष्याला जो आकार आहे,
तो देणारे अनेक लोक आहेत, त्यांपैकी फार थोड्यांना
मी ओळखतो. बाकीचे अनेक लोक अज्ञात आहेत.
त्यांचीही मी जाणीव ठेवली पाहिजे. आज माझ्या घरात
मी जी वीज वापरतो, तिच्यासाठी दूरवरच्या कोळसा खाणीतील
कुणी कामगार अथकपणे परिश्रम करीत असतो.
मला शुद्ध पाणी पिण्यास मिळते. जीवनावश्यक गोष्टी
मला सहजगत्या उपलब्ध होतात. अशा रीतीने
मला आजपर्यंत जे प्राप्त झाले आहे आणि अजूनही होत आहे,
ते इतरांना प्राप्त करून देण्यासाठी मी परिश्रमांची पराकाष्ठा
केली पाहिजे. फक्त, 'मी तर त्यांच्यासाठी पैसे मोजतो'
असे म्हणून भागणार नाही.

**- अल्बर्ट आइन्स्टाइन**

# भगिरथ प्रयत्न

*भगिरथाने गंगा पृथ्वीवर आणली. या कथेतील भगिरथ आणि त्याचे भगिरथ प्रयत्न यांचा विचार उलगडून दाखवणारा हा माहितीपूर्ण लेख. - संपादक*

आपण मराठी भाषेत 'भगिरथ प्रयत्न' असा वाक्प्रचार वारंवार वापरतो. याचा अर्थ अगदी पराकाष्ठेचे प्रयत्न. फार फार प्राचीन काळी इक्ष्वाकू वंशामध्ये भगिरथ राजा होऊन गेला. त्याने तप, कष्ट, ध्यान अशा निरनिराळ्या उपायांनी स्वर्गातून गंगा आणली. ही कथा 'गंगावतरण' या नावाने पुराणात, उपनिषदात प्रसिद्ध आहे.

भगिरथ राजाचे प्रपितामह सगर नावाचा प्रख्यात राजा होऊन गेला. त्याने त्याच्या प्रजेच्या कल्याणासाठी व अधिक ज्ञानोपासनेसाठी अश्वमेध यज्ञ केला व या अश्वाच्या रक्षणासाठी त्याचे पुत्रवत असलेले साठ हजार महावीर बरोबर पाठवले. हा यज्ञीय अश्व फिरत फिरत अयोध्येपासून गंगासागरापर्यंत गेला. तेथे कपिल नावाचे महर्षी धर्माचरण करून तपस्या करीत होते. त्यांनी हा यज्ञीय अंश्व पाहिला व त्याचे हरण करून आपल्या अश्वशालेत ठेवला. मागून येणाऱ्या सगर पुत्रांनी कपिल ऋषींना यज्ञीय अश्व सोडून देण्याविषयी विनवले व असेही सांगितले की हा यज्ञीय अश्व सोडून न दिल्यास धर्माप्रमाणे आपणाशी विनाकारण युद्ध करावे लागेल व संहार होईल. परंतु अश्व काही सोडण्यात येणार नाही काय करायचे असेल ते करा असे उत्तर सगरपुत्रांना दिले.

सगरपुत्रांनी युद्धास सुरुवात केली परंतु कपिल ऋषींनी आपल्या मंत्रसामर्थ्याने या साठ हजार अश्व रक्षकांचे जाळून भस्म केले. कालांतराने ही वार्ता सगर राजाला कळाली. तो त्वरित कपिल ऋषींचे आश्रमी आला व ऋषींना कळवळून प्रणाम केला व विनंती केली की, 'आचार्य माझ्या पुत्रांकडून आपला महान अपराध झाला आहे. परंतु मजवर कृपादृष्टी ठेवून यज्ञपूर्ततेसाठी अश्व माझे स्वाधीन करावा. आपणास अशीही प्रार्थना आहे की आपण भस्म केलेले माझे साठ हजार पुत्रांवर कृपादृष्टी करून प्राण दान करावे. मी आपली इच्छा पूर्ण करेन !

कपिल ऋषींनी सगर राजाला सांगितले, 'राजा मी तुझ्या यज्ञपूर्ततेच्या आड येत नाही. हा अश्व घेऊन जाऊन तुझ्या यज्ञाची सांगता कर. पण तुझ्या पुत्रांचे प्राण हवे असतील तर तू स्वर्गातून गंगेला पृथ्वीवर घेऊन ये. या देवनदीच्या पाण्याने तुझ्या पुत्र्यांच्या शवांना स्नान घातल्यास ते उठतील. तर त्या देवगंगेला येथे घेऊन ये.'

सगर राजा यज्ञीय अश्वाला घेऊन गेला व यज्ञाची सांगता केली. त्यानंतर स्वर्गीय देवगंगेला आणणाच्या कामास लागला. हे कार्य सगर राजाच्या कारकीर्दीत पुरे झाले नाही परंतु त्याचा प्रपौत्र भगिरथ याने तप करून महादेव शंकरास प्रसन्न करून घेतले व स्वर्गीय गंगा पृथ्वीवर आणली व तिला घेऊन गंगासागराला कपिल ऋषींच्या दर्शनास गेला. गंगेच्या जलाने सगरपुत्रांना स्नान घातले त्यायोगे ते सजीव होऊन नंतर स्वर्ग लोकी गेले अशी ही कथा आहे.

या कथेने जर्मन, स्वीडिश व अमेरिकन पुराशास्त्रज्ञ व विद्वान यांना आश्चर्यचकित व आकर्षित केले. अनेक तऱ्हेने विचार करून या कथेच्या मुळाशी जाण्याचा विचार करून व प्रत्येकाने दोन, दोन शास्त्रज्ञ भारताला पाठवले. त्यावेळी भारतात ब्रिटिशांचे राज्य चालू होते. अमेरिकन, स्वीडिश

व जर्मन शास्त्रज्ञांनी गंगेचा उत्तरांचलाचा प्रदेश हिंडून (पायी) पिंजून काढला. गंगा नदी, तिच्या उपनद्या सर्व डोंगराळ प्रदेश हिंडून आराखडे तयार केले व दिल्लीला येऊन ब्रिटिश राजवटीस आपला इरादा विशद केला. राजकर्त्यांनी त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे कबूल करून सर्व्हे ऑफ इंडिया या खात्याकडे त्यांना पाठवून सर्व्हे टीमची आखणी करून, गंगाशोधाच्या शोध यात्रेची आखणी केली. इ.स. १९०५ मध्ये या शोध मंडळात खालील लोक होते.

इंग्लिश - विल्यम कुक व स्विफ्ट
अमेरिकन - कोर्टने व जॉनसन
जर्मन - बेंकर व कुर्टहार्डस्टीन
स्विडिश - ऑसवर्ग, गोटेन्स्टीन

यापैकी कुक, कोर्टने, कुर्ट व आसबर्ग यांनी यात्रेबरोबर जाणेचे ठरले व त्यांच्याबरोबर जरूर तो नोकरवर्ग व साधनसामुग्री उपलब्ध करून दिली. बाकीच्या लोकांनी दिल्लीत राहून हिंदू, जैन, बौद्ध साहित्यातून गंगेबद्दलच्या कथा शोधून काढून त्याचे विश्लेषण करण्याचे ठरवले.

स्विफ्ट जॉनसन, बेंकर हे पुराशास्त्री व प्राचीन इतिहासाचे, तज्ज्ञ लोक होते.

दिल्लीतील लोकांनी गंगेविषयी खालील माहिती गोळा केली.

१) गंगा स्वर्गलोकी देवगंगा म्हणून प्रसिद्ध होती.

२) गंगेचा उगम शंकराच्या निवासस्थानापासून (कैलास पर्वतापासून) झाला आहे.

३) देवगंगा मानससरोवराजवळून वाहत येऊन हिमालय पर्वताच्या उत्तरेकडील पायथ्याजवळ येते. तेथे देवगंगेने पृथ्वीवासियांसाठी हिमालयाच्या पायथ्याशी जलाशय निर्माण केला आहे.

४) भगिरथराजाने तप करून गंगेला प्रसन्न करून घेतले व तिला भारतातील मानवांच्या कल्याणासाठी भारतात येण्याची प्रार्थना केली व ती गंगेने कबूल केली.

५) गंगेने भगिरथराजाला सांगितले की, 'मी स्वर्गातून पृथ्वीवर येणार तेव्हा माझा वेग पृथ्वीमातेला सहन होणार नाही. फक्त महादेव शंकरच माझा वेग सहन करू शकेल.'

६) स्वर्गातून खाली येताना देवगंगेला गर्व झाला की, 'माझ्याएवढी बलवान कोणी नाही. महादेव शंकरालाही मी माझे वेग सहन करण्यास लावेल.

७) सगर राजाने अश्वमेध सांगता केली व देवगंगेच्या अवतरणाच्या प्रयत्नास लागला. हा प्रयत्न सगर, असमंजस, अंशुमान, दिलीप व भगिरथ अशा इक्ष्वाकु वंशाच्या ५ पिढ्या होईपर्यंत म्हणजे अंदाजे ३०० ते ४०० वर्षे चालला होता.

८) गंगेचे गर्वहरण करण्यासाठी महादेवाने गंगेस आपल्या जटांमध्ये कोंडून ठेवले. भगिरथ राजाने पुन्हा शिवाचे तप करून प्रसन्न करून गंगेला मोकळे करून घेतले.

या सर्व हकिगतीचा अर्थ या शोध मंडळाने पुढीलप्रमाणे लावला.

१) देवगंगा कैलास पर्वताजवळून उगम पावून मानससरोवराजवळून वहात येऊन हिमालयाच्या उत्तर पायथ्याजवळ आली.

२) हिमालयाच्या उत्तर पायथ्याजवळ जलाशय असून त्याचे पुराण कालापासून बिंदुसरोवर असे नाव आहे. याचा अर्थ असा की, या कैलास पर्वतापासून वहात येणाऱ्या नदीला हिमालयाच्या पायथ्याशी बंधारा घालून जलाशय बनवला असला पाहिजे.

३) हिमालयाच्या उत्तरेकडील भागाला स्वर्ग असे म्हणत

असत.

४) गंगा बिंदू सरोवरापासून वाट काढून भारतात अति उंचावरून आली आहे व ती धबधब्याप्रमाणे कोसळते आहे.

५) बिंदू सरोवरापासून चार-पाच प्रवाह भारतात नदीरूपाने येत आहेत ते म्हणजे १) भगिरथी २) मंदाकिनी ३) धौली गंगा ४) अलकनंदा ५) जान्हवी. वास्तविकत: या निरनिराळ्या नद्या असून त्यांचे प्रवाह निरनिराळ्या संगमावर एकत्र येऊन देवप्रयागला शेवटचा उत्तरांचलातील संगम असून ती हृषीकेशपासून भारतात गंगा म्हणून ओळखली जाते व तेथून हरिद्वार, लखनौ, कानपूर, आलाहाबाद, वाराणसी, पटणा मार्गे गंगासागराला मिळते.

वरील ५ नद्या या निराळ्या नद्या नसून गंगेचीच निरनिराळी नावे आहेत, असे पुराणे सांगतात.

६) या सर्व नद्यांचा उगम व परिसराचा व नद्यांच्या मार्गाचा अभ्यास केल्यास जी भगिरथ राजाने आणलेली नदी ही हल्लीची भागिरथी नदी नसनू गंगेची उपनदी असलेली 'अलकनंदा' नदी आहे असे वाटते.

या सर्व विश्लेषणाचा अभ्यास लक्षात घेऊन गंगा शोधमंडळाने असे ठरवले की,

१) वरील ५ ही नद्यांच्या भारतातील उगमाच्या मूळ पर्वताचा प्रदेश ओलांडून पलीकडे जाऊन बिंदू सरोवराचा शोध घेणे.

२) बिंदू सरोवराची सर्वप्रकारे संपूर्ण पहाणी करणे.

३) निरनिराळ्या नावांनी गंगा अस्तित्वात असेल त्या सर्व नद्यांच्या मार्गांचा अभ्यास करणे.

४) बिंदू सरोवरात विलीन झालेल्या देवगंगेचा मार्ग पाहून तेथील प्रदेशाचा अभ्यास करणे

यापैकी यात्रा मंडळाच्या चार सदस्याबरोबर पुरेशी सामग्री, हत्यारे, अन्न, पर्वत चढणे-उतरणे, बर्फाळ प्रदेशात हिंडणे वगैरेसाठी उपयोगी असे सर्व सामान व वाहतुक व्यवस्था व कामगारांचा ताफा देऊन पाठविले. या यात्रा मंडळात कुक, कोटेने, कुर्ट हार्डस्टीन व आसबर्ग होते.

त्यांनी भागिरथी (गंगोत्री गोमुखापर्यंत), जान्हवी (गंगोत्री २ पर्यंत), मंदाकिनी केदारनाथ व पलीकडे उगमापर्यंतचा परिसर हिंडून तपासला. नंतर अलकनंदा नदीच्या काठाने जोशी मठापर्यंत जाऊन अलकनंदेचा उगम पाहिला.

अलकनंदा नदी ४-४१/२ हजार फुटावरून खाली तयार झालेल्या पाण्याच्या डोहात अत्यंत वेगाने कोसळत होती. गंगा शोधमंडळींची खात्री पटली की गंगेने भगिरथ राजाला सांगितलेले बोल सत्य आहेत. इतक्या उंचावरून कोसळणारा पाण्याचा ओघ, डोहात कोसळल्याने बराच कमी होत होता. शिवाय, डोहाच्या तळाला पांढरा ग्रॅनाइट खडक असूनही त्या खडकाला ५-६ फुटाचा खड्डा झालेला आहे. डोहात ३०-३५ फुटाचे पाणी उभे आहे. या व्यवस्थेला 'महादेवाचे मस्तक' असा योग्य शब्द वापरला आहे. यात्रामंडळाच्या सभासदांना आश्चर्य व प्राचीन मानवाच्या बुद्धीचे कौतुक वाटले.

भागिरथी, मंदाकिनी, जान्हवी, धौली गंगा व अलकनंदा या पाच नद्यांपैकी अलकनंदा व भागिरथी या दोनच नद्या उगमापासूनच मोठ्या नद्या आहेत.

१) भागिरथी गंगोत्रीच्या पायथ्यापासून १००-१५० फूट उंचीवरच्या एका गुहेतून बाहेर येते. गुहेच्या मुखावर मोठे गोमुख करून त्यातून नदी बाहेर येते. गंगा स्वर्गातून आल्याप्रमाणे वाटत नाही व भागिरथी नदीला मुखाजवळ वेगही नाही.

२) बद्री केदारनाथाच्या देवळातील गौरीकुंडातून

मंदाकिनी नदी बाहेर येते. येथे तिचे स्वरूप लहान ओढ्याएवढे आहे.

या सर्व वर्णनावरून व भौगोलिक पर्यावरणावरून शोध मंडळाची खात्री पटली की, भगिरथ राजाने आणलेली गंगा म्हणजे अलकनंदा नदी होय.

या शोधमंडळाच्या यात्रा विभागाने या ५ ही नद्यांचे पाणी तांब्याच्या तपेलीत भरून सील करून प्रत्येक १० मैलाच्या अंतरावरचे नमुने दिल्लीला संशोधनाप्रीत्यर्थ पाठवण्यास सुरुवात केली. शोध मंडळातील सदस्यांना गंगेच्या पाण्याची महती समजलेली होती. त्याची संपूर्ण चिकित्सा करण्यासाठी निरनिराळ्या पाण्याचे नमुने दिल्लीला पाठवीत होते.

अलकनंदा जेथून येत होती त्या पहाडावर अलकनंदेला पूर्वेकडून वळसा घालून चढण्यास सुरुवात केली. ४-४$^{१}/_{२}$ हजार फूट उंच पहाड आहे. या मंडळींना हा पहाड चढून जाण्यास २$^{१}/_{२}$ ते ३ दिवस लागले कारण चढण खडी व अवघड होती. पहाड चढून वर गेल्यावर त्यांना पहाडाच्या पलीकडे उत्तरेस एक मोठे सरोवर दिसले. हे सरोवर २-२$^{१}/_{२}$ मैल दक्षिणोत्तर रुंद असून पूर्व-पश्चिम अंदाजे ३०-३५ मैल लांब पश्चिमेकडे पसरलेले होते. ते हे पुराणप्रसिद्ध बिंदू सरोवर असावे असे त्यांना वाटले.

शोधमंडळ वरून खाली बिंदू सरोवराजवळ उतरले तेव्हा त्यांना नदी अडवणारा बंधारा दिसला. ते नंतर तेथील बंधाऱ्यावर आले. तेव्हा त्यांना दिसून आले की बंधारा १$^{१}/_{४}$-१$^{१}/_{४}$ मैल लांबीचा असून तो मृत्तिकी बंधारा नाही तर स्थापत्यशास्त्रानुसार व्यवस्थित बांधलेली भिंत आहे. बंधाऱ्याच्या माथ्यावर १०-१२ फूट रुंदी असून ती खाली वाढत गेलेली आहे. बंधाऱ्याच्या एका बाजूला अडवलेला नदीचे २५-३० मैल लांबपर्यंत अडलेले पाणी उभे असून दुसऱ्या बाजूला नदीचे मोकळे पात्र आहे. बंधाऱ्याच्या पश्चिमेकडे $^{१}/_{२}$ मैलावर दक्षिणेकडे ४०-५० फूट रुंदीचा कालवा काढून पहाडाच्या कडेपर्यंत नेला असून त्या पहाडावरून या सरोवराचे पाणी दक्षिणेकडील बाजू वरून खाली ३५०० ते ४००० फूट हे पाणी कोसळत होते. प्रवाहाच्या पाण्याची खोली अंदाजे १२-१५ फूट होती. शोध मंडळाची खात्री झाली की स्वर्गातील देव गंगा ती हीच, स्वर्ग म्हणजे १५-१७ हजार फुटावरील ह्या पहाडाच्या रांगेपलीकडील डोंगराळ थंड बर्फाळ प्रदेश व या प्रदेशात राहणारे लोक म्हणजे देव. महादेव शंकर म्हणजे या पहाडी प्रदेश, उत्तरेकडील डोंगराळ व पठारी प्रदेश (१५-१७ हजार फुटावरती) यामध्ये सतत फिरणारा फिरस्ता. त्यामुळे या देवाला या प्रदेशांची खडान्खडा माहिती होती. पहाडातील, उत्तरांचलातील व स्वर्गप्रदेशातील सर्व वनस्पतींची -उपयोगाची संपूर्ण माहिती होती. म्हणून या महादेव शिवाला आदि-भिषग म्हणजे पहिला वैद्य म्हणतात व त्याच्यापासून वैद्यक शास्त्राची उत्पत्ती झाली. शोध मंडळाने बिंदू सरोवराचे व बंधाऱ्याचे अन्वेषण सुरू केले.

अडवलेला बिंदू सरोवराचा जलाशय पूर्व पश्चिम २५-३० मैल लांब असून रुंदी साधारणपणे ४-५ मैल आहे. पश्चिमेच्या किनाऱ्यापासून उत्तरेकडून नदी येऊन पाणी बिंदू सरोवरात ओतत असते. पावसाळ्यात पावसाचे पाणी व उन्हाळ्यात वितळलेल्या बर्फाचे पाणी अशा दोन नद्यांचे पाणी सरोवरात भरत असते व हे आलेले पाणी बंधाऱ्याकडील कालव्यावाटे उत्तरांचलात अलकनंदेचे रूप घेऊन उतरत आहे. बिंदू सरोवराच्या दोन्ही किनाऱ्यांचे दगड लायनिंग देऊन मातीची धूप थांबवली आहे व सरोवर मातीने भरून जाऊन पाण्याचा साठा कमी होण्याचा मार्ग कायमचा बंद केला आहे. किनाऱ्याच्या दगडी लायनिंगची जाडी २ ते २$^{१}/_{२}$ फूट आहे व किनाऱ्याची माती जलाशयात न येईल अशा रीतीने दगड बसवलेले आहेत.

बंधाऱ्याची पहाणी करताना तर मंडळ आश्चर्याने थक्क झाले. बंधारा पूर्वेकडे अगदी खडा न बांधता थोडा उतार

देऊन बांधला आहे. बंधारा १२५ ते १५० फूट उंच आहे. पहारी व टिकाव वगैरे हत्यारांनी पृष्ठभागावरील माती बाजूला केल्यानंतर आतील दगडांनी बांधलेली भिंत दिसते. एकेक दगड व्यवस्थित असे घडवलेले आहेत की मधील भेगेतून मातीचे कणही जाणार नाहीत. एकेक दगड ३ ते ३$^1/_2$ फूटाच्या रुंदी जाडीचा असून एकेकाचे वजन १२-१५ फूट असावे. एकमेकात व्यवस्थित बसवलेले आहेत. हे दगड पांढऱ्या ग्रॅनाइटचे असून अतिशय कडक व कठीण आहेत. (या दगडाचे २-४ कपचे काढून दिल्लीला तपासणी (कार्बन १४ पद्धतीने) केल्यावर या दगडांचे आजचे वय साधारणपणे ९००० वर्षे असल्याचे समजते. मंडळाने बिंदू सरोवाचे पाणी १०-१५ ठिकाणहून नमुने घेऊन दिल्लीला पाठवले. उत्तरेकडून पाणी आणणाऱ्या नदीच्या पाण्याचे नमुनेही पाठवले. शोधमंडळाला या बंधाऱ्याचे बांधकाम व इजिप्तमधील गिझा येथील पिरॅमीडचे बांधकाम यात विलक्षण साम्य दिसून आले.

१) प्रत्येक दगडाचे १०-१२-१५ टनाएवढे वजन

२) साही बाजू व्यवस्थिपणे घडवून खोबण आकड्याची सोय केली आहे.

३) दगड एकमेकात बसवल्याने पातळ वेलही आत शिरू शकत नाही.

४) दगड खाणीतून काढून, घडवूंन, कामाच्या ठिकाणी आणून व्यवस्थितपणे एकमेकात अडकवून बसवलेले आहेत.

५) बांधकामात कोणताही चुना, सिमेंट किंवा अन्य तऱ्हेचा मार्टर वापरलेला नाही.


६) दगड बसवण्याच्या जागा १५०-३०० फूट किंवा त्याही पेक्षा जास्त उंचावर आहेत.

७) दोन्ही बांधकामे ९००० किंवा त्याहीपेक्षा जास्त वर्षापेक्षा जुने आहेत.

८) आताप्रमाणे, वाहतुक करणे किंवा उचलणे व व्यवस्थित बसवणे यासाठी वापरात असणारी यंत्रे त्यावेळी नव्हती. लोखंड पोलादाचाही जन्म त्यावेळी झालेला नव्हता.


हे सर्व पाहून बंधारा व जलाशय यांचा पूर्ण अभ्यास करून ते परतीच्या मार्गाला लागले. पहाड उतरून खाली आल्यावर अलकनंदा नदीच्या मार्गाचे परीक्षण करत सर्व खोऱ्याचे परिक्षण करून जाण्याचे त्यांनी ठरवले.

१) अलकनंदा नदी पहाडावरून खाली १५-२० फूट खोल असलेल्या डोहात कोसळते. तो डोह व आजूबाजूचा भाग मिळून $^1/_2$ x $^1/_2$ मैल एवढ्या क्षेत्राचे तळे झालेले आहे. या तळ्याच्या पुढे २ जोडींची २०००



चित्र नं. १

चित्र नं. २




फूट x ५००० फूट एवढी २ तळी आहेत. या दोन्ही तळ्यात लव्हाळ्यासारखे व पाणवनस्पती झाडे उगवलेली असून त्यानीच तळी भरलेली आहे. त्यापुढे ¹/₂ x २ मैल अशी एकापुढे एक अशी दोन तळी असून तीही जोडतळ्याप्रमाणे लव्हाळी व पाणझुडुपे यानी भरलेली होती. या शेवटच्या तळ्याच्या पुढून अलकनंदेचा प्रवाह पुढे निघाला. हे ठिकाण अलकनंदेचा प्रपात व जोशी मठ (हल्लीचा) यामध्ये आहे. अलकनंदा जोशी मठाचे पुढे निघाल्यावर एका पहाडाच्यामधून पुढे निघाली आहे. या पहाडाचे वैशिष्ट्य असे की या पहाडाची वाट नसती तर सर्व जोशी मठ केदारनाथ गंगोत्री वगैरे प्रदेश जलमय झाला असता. त्यासाठी हा उंच पहाड सुरीने कापल्याप्रमाणे उभा छेदून मधे अंदाजे २०० फुटांनी नदीच्या प्रवाहासाठी वाट करून दिली आहे.

चित्र क्र. १ मध्ये बिंदू सरोवर, कालवा, बंधारा, देवगंगा नदी, अलकनंदेचा प्रपात व पाच जलाशये व कापलेल्या पहाडाची जागा दाखवली आहे.

चित्र क्र. २ मध्ये कापलेला पहाड दाखवला असून अलकनंदा नदी तळातून वाहात असलेली दाखवली आहे.

चित्र क्र. ३ मध्ये उत्तरांचल प्रदेशाच गंगेचे खोरे - गंगोत्री, बद्रीकेदार, जोशीमठ, नंदादेवी पर्वत, डेहराडून वगैरे भाग दाखवणारा संपूर्ण नकाशा दाखवला आहे. या तीनही चित्रांच्या योगे या भगिरथ प्रयत्नाच्या योजनेचा तपशील पूर्णपणे ध्यानात येईल. पुष्कळांना वाटते भगिरथाच्या नावावरून भागिरथी नदी असे नाव पडले असून हीच भगिरथ राजाने आणलेली नदी आहे. परंतु गंगावतरण भगिरथ कथा यात दिलेल्या गंगेच्या वर्णनावरून भागिरथी ही नदी नसून अलकनंदा नदी हीच गंगा नदी आहे.

शोधमंडळाला हे सर्व पाहून अतिशय आश्चर्य वाटले. ९००० वर्षापूर्वी कोणतीही आधुनिक वाहतुकीची, खाणीच्या कामाची, धडायच्या कामाची यंत्रे नसतानाही अशा तऱ्हेचे प्रचंड काम योजनाबद्ध रीतीने केलेले पासून प्राचीन मानवाची बुद्धी, योजकता, कामे करण्याची व करून घेण्याची हातोटी, दीर्घ काळपर्यंत कामाच्या व्यवस्थापनाचा आवेग कायम राखण्याचे धैर्य चिकाटी व सर्वांगीण विचार करून योजना तयार करून, सातत्य राखून


UTTARANCHAL
CHINA
TIBET
NEPAL
HIMACHAL PRADESH
HARYANA
DEHRA DUN
UTTARANCHAL
INDIA
UTTAR PRADESH
15

कार्यवाहीत आणण्याची जिद्द, मनोधैर्य पाहून शोधमंडळ आचंबित झाले. यानंतर शोधमंडळ दिल्लीला परतले. त्यांनी बरोबर नकाशे, मोजमापे, चित्रे वगैरे संशोधीत साहित्य आणले होते.

दिल्लीत मागे राहिलेल्या चौघा जणांनी शोधयात्रीकडून आलेले पाण्याचे नमुने, दगडाचे नमुने या सर्वांची सर्वांगीण तपासणी करून त्याचे परीक्षण तयार ठेवलेले होते.

या शोधमंडळाच्या आठही सभासदांनी मिळून विचार विनिमय करून पुढील निष्कर्ष काढले.

१) सगर राजा गंगासागराहून कपिल मुनींचा संदेश घेऊन आला व त्याच्या सर्व आप्तेष्टांनी, मंत्रीगणांनी इतर पुत्रवत जनतेने स्वर्गातून गंगा आणण्याचा निर्धार केला.

२) यासाठी सगराने आपले उरलेले आयुष्य खर्च केले.

३) सगराचा पुत्र असमंजस याने युवराजकालापासून अखेरपर्यंत याच योजनेसाठी आपले सर्व आयुष्य खर्च केले.

४) सगर राजाचा नातू असमंजसपुत्र अंशुमान हा पुत्र होईपर्यंत आयोध्येत राहिला व नंतर तो या कार्यासाठी जाऊन आपले सर्व आयुष्य या कार्यासाठी खर्च करण्यासाठी आपला पुत्र दिलीप याच्या व त्याच्या मातेच्या हाती राज्य व गृह कारभार सोपवून स्वर्गलोकाकडे निघून गेला.

५) याचप्रमाणे सगरराजाचा पणतु दिलीप हा त्याचा पुत्र भगिरथ हा राज्य व गृह कारभार पहाण्यास योग्य होईपर्यंत कारभार पाहून भगिरथ व त्याच्या मातेकडे कारभार सोपवून गंगा कार्यासाठी स्वर्ग लोकाकडे निघून गेला.

६) याचप्रमाणे सगर राजाचा प्रपौत्र पौत्र भगिरथ हा त्याचा पुत्र हा राज्य व गृह कारभार पहाण्यास योग्य होईपर्यंत कारभार पाहून व त्याच्या मातेकडे कारभार सोपवून गंगाकार्यासाठी गेला.

७) या काळी मानवाला २००-२५० वर्षांचे सर्वसाधारण आयुष्य असे. स्वर्गाकडे गेलेले राजा २-३ वर्षांनी परत येऊन आपल्या राज्यांना व कुटुंबियांना भेटून जात असत.

८) वरील सर्व राजे जाताना आपल्याबरोबर ५-१० हजाराची जनता गंगाकार्यासाठी घेऊन जात असत.

९) स्वर्गात नेलेल्या जनतेवर राजांचे पुत्रवत प्रेम असल्याने त्यांना त्या त्या राजांचे पुत्रच म्हटले आहे.

१०) या ठिकाणी स्वर्गलोक याचा अर्थ (गंगोत्री, केदार, जोशी मठ याच्या) उत्तरेला असलेल्या उत्तुंगपहाडापलीकडील डोंगराळ, बर्फाळ पठारी प्रदेश. मृत्यू नंतरचे जग असा अर्थ घ्यायचा नाही.

११) प्रथम गेलेल्या सगर व असमंजस राजांनी स्वर्गातून देवगंगेला भारतात आणण्यासंबंधात प्रदेश पाहणी करून कार्याची आखणी केली.

प्रथम देवगंगेच्या प्रवाहाची पहाणी केली. या नदीचे पाणी भारतात आणावयाचे तर नदीला योग्य जागी बंधारा घालणे आवश्यक आहे. बंधारा कोठे, कसा व काय आकाराचा घालावयाचा हे पाहणी करून ठरवणे जरूरी होते. बंधारा घालून जलाशय निर्माण होईल. पण ते पाणी एवढा उत्तुंग पहाड उतरवून अयोध्येकडील मैदानांतून गंगासागरापर्यंत नेण्याचा संपूर्ण आराखडा तयार केल. या देवगंगा योजना ठरवण्यासाठी उत्तराखंड व स्वर्गलोक याची खडानूखडा माहिती असलेल्या शिवशंकर महादेवास भेटून त्यास प्रसन्न करून घेतले व या योजनेसाठी सर्वतोपरी मदत मिळवली. शिवशंकराचे वास्तव्य याच प्रदेशात होते व तो या भागातून सतत निरनिराळे ज्ञान मिळवित फिरत असे.

देवगंगेच्या पाण्यात अशी काही द्रव्ये आहेत की,

१) ते पाणी दीर्घ कालपर्यंत जरी साठवून ठेवले तरी

ते कुजत नाही, खराब होत नाही.

२) यामध्ये सूक्ष्मजंतू, बॅक्टेरिया, जिवंत राहू शकत नाहीत. बाहेरचे दूषित पाणी जरी यात मिसळले तरी त्या पाण्याचा दोष नाहीसा होऊन पुन्हा ते आरोग्यदायी होते.

३) या पाण्याच्या नित्य सेवनाने दीर्घायुष्य, विनाव्याधी लाभते.

४) या पाण्याच्या नित्य सेवनाने मनोवृत्ती प्रसन्न राहून बुद्धी प्रगल्भ राहून अतींद्रिय शक्ती, मनोबल वाढवणे सुकर होते.

५) कपिल ऋषींनी उत्तराखंडाची व स्वर्ग लोकाची यात्रा त्यांच्या पूर्वायुष्यात केली असल्याने त्यांना या नदीच्या जलाची महती माहीत होती.

६) ज्यावेळी सगर राजाने अश्वमेध यज्ञ केला त्यावेळी उत्तर भारतातील बऱ्याचमोठ्या प्रदेशात कित्येक वर्षे सतत टिकलेला दुष्काळ पडला होता. त्याचे निवारण करण्यासाठी कायमचा प्रवाह देणाऱ्या नदीची जरुरी निर्माण झाली होती व लोककल्याणासाठी कपिलाने राजाला देवगंगेची अट घातली व राजाला देवगंगा आणण्याची निकड निर्माण केली.

सगर व असमंजस यांनी देवगंगेचे पाणी वर्षोनुवर्षे घशात ठेवून ते दूषित होते का ते पाहिले व हे पाणी आरोग्य व जीवनदायी असल्याची त्याची खात्री पटली. शिवशंकर महादेव यांच्या मदतीने व सल्ल्यानुसार बंधारा बांधण्याची जागा व गंगेच्या उत्तराखंडातील प्रपाताची जागा वगैरे संकल्प नक्की केले. हा सर्व देवगंगा प्रकल्प याची आखणी सगरादि राजांनी शिवशंकर महादेवांच्या मार्गदर्शनाने केली.

सगर-असमंजस राजांनी आपले ६०,००० पुत्र (पुत्रवत जनता) जमा करून उत्तराखंडाकंडे वाटचाल केली. उत्तराखंडातून पहाड चढून स्वर्ग लोकात सर्वांना नेले व बंधारा बांधण्याच्या कामाला सुरूवात केली. त्यांनी कामाची विभागणी करून लोकांना वाटून दिले.

सर्व गंगा स्वर्गातून आणून डोंगराळ प्रदेशातून वाट काढत मैदानावर आणली व तेथून गंगासागराला नेली. या सर्व कार्याला ९००० वर्षांपूर्वी ६०-७० हजार लोकांच्या मनुष्यबळालासुद्धा २५०-३०० वर्षाचा काळ लागला. (५-६ पिढ्या या योजनेत खपल्या) पण काम तडीस नेले.

अंशुमान राजाने हरिद्वारपासून गंगासागरापर्यंत गंगा नेण्यासाठी साधारणपणे १००० ते २५०० फूट रुंदीचा व ३०-४० फूट खोल असा कालवा गंगेचे पाणी येईपर्यंत जरूर होते, म्हणून या कार्याची जबाबदारी आयोध्येतील मागे राहिलेले राजवंशीय व मंत्रीमंडळ यांचेवर सोपवले व उत्तराखंड व स्वर्गात काम ही अयोध्येतून गेलेले सगर असमंजस व त्यांनी नेलेली पुत्रवत प्रजा यांनी करण्याचे असे ठरवले. शिवाय वरील राजांकडील मनुष्यबळ कमी झाले तर ३-५ वर्षांनी कोणी राजाने येऊन आणखी बल घेऊन जाण्याचा विचार झाला.

गंगा शोधमंडळाने भगिरथापेक्षा सगर-असमंजस यांचे कार्यच जास्त मौल्यवान मानले कारण-

१) त्यांनी प्रथम जाऊन स्वर्गातील परिस्थितीची पाहणी करून शिवशंकर या स्थानिक तज्ज्ञाची मदत मिळवली.

२) शिवशंकर यांच्याशी विचार विनिमय करून संपूर्ण गंगायोजनेचा आराखडा तयार केला.

३) बंधारा व नदीच्या व उत्तराखंडातील तलावाच्या बाजू व तळ यातून माती धुपून जाऊ नये म्हणून करण्यात येणाऱ्या फरसबंदी साठी लागणारा भरपूर प्रमाणातील दगड (मोठमोठ्या खाणी) यांची शिवशंकर यांच्याशी विचार करून १) खाणीतून काढणे २) घडवणे ३) वाहतुक करणे व ४) ठरलेल्या पद्धतीप्रमाणे योग्यप्रकारे बसवणे. या

बद्दलच्या पद्धती कामातील अडचणी व सोडवणूक यासंबंधीचा विचार करून योजना ठरवली.·

४) एवढा मोठा ६०-७० हजारांचा (स्त्रीपुरुष दोन्ही) मनुष्य बळासाठी अन्न, वस्त्र, निवारा, पाणी व त्याचे स्वास्थ्य यांचा विचार करून योजना तयार केली.

५) आजच्यासारखी निरनिराळी कामे करणारी यंत्रे व रसायने त्यावेळी नसतानाही लोखंड, पोलाद यासारखे कठीण धातूही नसताना कार्याच्या पद्धतीची आखणी ही जास्त महत्त्वाची आहेत व ते काम सगर- असमंजस यांनी शिवशंकर यांचे मदतीने केले. संपूर्ण योजनेचा पायाच या दोघांनी घातला. यावरून हे राजद्वय व शिवशंकर किती उच्च प्रतीचे शास्त्रज्ञ व योजक (Engineer) होते याची कल्पना येते.

काही वर्षांनी अंशुमान राजा त्यांना येऊन मिळाला त्यांनी सर्व मनुष्यबळाची व्यवस्था लावून विभागणी करून कामे वाटून दिली व हळुहळू कामास सुरूवात केली.

१) खाणी खोदून दगड काढणे, दगड पूर्णपणे घडवणे व त्याचा पुरेसा साठा करणे, हे कार्य सुरू केले.

२) सरोवराचे किनारे व तळ खोदून त्याला दगडाचे पदर लावणे त्यासाठी लागणारी खोदाई करणे व खोदलेली माती किनाऱ्यावर दूरवर टाकणे ही कामे आस्ते आस्ते सुरू केली, कमी कष्टाची वाहतुकीची कामे स्त्रियांवर सोपवली. शिवाय गृहव्यवस्था (अन्नपाणी, निवारा, स्वास्थ्य राखणे) याची संपूर्ण जबाबदारी स्त्रियांनी उचलली.

या तऱ्हेने योजकता (Planning), कार्यारंभ (Maintainance सह कामाची सुरूवात) व कार्य व्यवस्थापन याच्या एवढ्या पुरातनकाळी कोणत्याही सुविधांची असाध्यता असतानाही केली याबद्दल गंगाशोध मंडळाने गौरवात्पर नोंदणी Survey ऑफ India या खात्याच्या दप्तरात विशेषत्वाने नोंद करून ठेवली आहे.

एवढ्या पुरातन काळीही या राजांना देवगंगेच्या पाण्याची महती शोधून [ (1) Property of decay Resistance, 2) Property of killing Bactaria & Viruses, 3) Suitability of water as medicene & disinfectant] जगाला सांगितली. याबद्दल ही शोधमंडळाने या राजांचे कौतुक केले आहे.

या एवढ्या मोठ्या अजस्त्र कार्याला आजच्या आधुनिक यंत्रे, रासायने, इंधने, इत्यादी सुविधांनु युक्त असूनही ४०-५० वर्षांचा काल सहज लागतो, तर एवढ्या पुरातनकाळी अवघ्या २५०-३०० वर्षांच्या काळात ही योजना या राजांनी पुरी केली.

या राजांच्या पाच पिढ्यापैकी पहिल्या दोघांनी योजनेची पहाणी करून कार्याची आखणी केली. नंतरच्या दोन राजांना या कार्याची कार्यवाही केली व शेवटचा राजा भगिरथ याने या कार्याची सांगता करून गंगा गंगासागरापर्यंत नेली हा इतिहास आहे. पुराणे व उपनिषदे यांनी भगिरथाने कार्याची सांगता केली म्हणून जास्त महत्त्व देतात परंतु शोधमंडळाने या कार्याबद्दल सगर व अंशुमन यांचे अधुनिक काळातील पाश्चात्त्य स्थापत्यविशारदांपेशाही शतपटीने उत्तम आखणी केल्याबद्दल जास्त कौतुक करतात व श्रेय देतात. तितकेच श्रेय आखणीप्रमाणे उत्तमरीतीने योजना कार्यवाहीत आणल्याबद्दल अंशुमान व दिलीप हेही याच्या श्रेयाचे मानकरी आहे. भगिरथाने संपत आलेले कार्य संपवून या योजनेची सांगता केली.

- अ. ह. पटवर्धन
दूरध्वनी : २५३४ २२८७

# वास्तुकलेचे आणखी काही नमुने

*भारतातील वास्तुकलेचे उत्तम नमुने माहीत व्हावेत या उद्देशाने मंजिरी दांडेकर यांनी लिहिलेल्या लेखातील हे दोन लेख - संपादक*

## गोव्याची चर्चेस

गोवा किंवा गोमंतक हा प्रदेश भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कोकणपट्टीचा दक्षिणेकडील भाग होय. इ.स. १५१० मध्ये अल्बुकर्कने गोवा शहर घेतले. त्याचवेळी कॅथॉलिक पाद्र्यांनीही त्याचा ताबा घेतला आणि धर्मांतराच्या कामास हळूहळू प्रारंभ झाला., कॅथॉलिक हा ख्रिश्चन धर्माचा एक पंथ किंवा संप्रदाय होता आणि इतर पंथांपेक्षा तो अधिक कर्मठ होता. या पंथाद्वारे हिंदूंचे धर्मांतर घडवून आणणे व कॅथॉलिक पंथियात शिस्त निर्माण करणे यासाठी काही सोसायट्या व मंडळे निर्माण झाली होती. पोर्तुगीजांनी धर्मांतराबरोबरच गोव्यात सर्वत्र ख्रिस्तमंदिरे बांधण्याचाही उपक्रम केला. काही ठिकाणी हिंदूंची देवालये मोडून त्याच जागी चर्चेस बांधण्यात आली. तर काही चर्चेस नवीन जागी बांधण्यात आली. आज गोमंतकात जी हिंदूंची देवालये आहेत त्याच्या मानाने ही ख्रिस्तमंदिरे भव्य आहेत. पोर्तुगीजांनी बांधलेल्या येथील वास्तूंपैकी फार थोड्या वास्तू चांगल्या स्थितीत आहेत त्यांच्यापैकी काहींची माहिती अशी -



बॉंजेझूस चर्च येथे सेंट फ्रान्सिसचे शव ठेवण्यात आले आहे.



बॉंजेझूसचा कॉन्वेंट ही जुन्या गोवा शहरातील प्रसिद्ध वास्तू असून त्यातच सेंट फ्रान्सिस झेवियरचे शव ठेवण्यात आले आहे. या मंदिराचे होली साक्रामेंट व सेंट झेवियरचा टॉंब असे दोन भाग आहेत. इ.स. १६०५ मध्ये हा कॉन्वेंट बांधण्यात आला व १६५५ मध्ये सेंट झेवियरच्या जीवनातील कित्येक प्रसंग चित्रित केलेले असून ती चित्रे किमान ४०० वर्षापूर्वीची आहेत. गॉथिक शिल्पशैलीची गोव्यातील ही एकुलती एक वास्तू होय. पॅट्रिआर्कन किंवा कॅथेड्रल ऑफ गोवा ही इमारत बॉंजेझूसच्या मंदिरापेक्षा अधिक भव्य असून अधिक जुनी आहे. आल्बुकर्कने गोवा शहर घेतले तो दिवस सेंट कॅथरिनचा होता म्हणून तिच्या नावे १५१० मध्येच त्याने प्रथम एक छोटे चॅपेल बांधले व नंतर वरील इमारत उभी करण्यात आली. या कॅथेड्रल मध्ये १४ वेदी असून गोव्यातील सर्वांत मोठी घंटाही याच इमारतीत आहे. सेंट ख्रिस्तोफर, येशू ख्रिस्तावरील खटला, सेंट कॅथरीनच्या जीवनातील प्रसंग इत्यादी अनेक विषयांवरील चित्रे याही कॅथेड्रलमध्ये आहेत.

सेंट फ्रान्सीस ऑफ आर्सीसीचा कॉन्वेंट हा



कॅथेड्रल ऑफ गोवा



सेंट कॅजेटनचा कॉन्वेंट



सेंट फ्रान्सिस असीसीचा कॉन्वेंट

कॅथेड्रलच्या मागच्या बाजूला लागून आहे. इ. स. १५१७ साली फ्रान्सीस्कनांनी तो बांधला. त्याला जोडून असलेले चर्च १५३० साली बांधण्यात आले. कॉन्वेंटचा दर्शनी भाग पोर्तुगीज बादशहा मानुएल याच्या काळातील शिल्पाकृतीचा उत्कृष्ट नमुना आहे. या कॉन्वेंटमध्ये जुन्या गोव्यात पोर्तुगीजांनी भ्रष्ट केलेल्या हिंदूंच्या दगडी मूर्तींचे अवशेष ठेवण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर आता या कॉन्वेंटचे रुपांतर म्यूझियममध्ये करण्यात आले असून तेथे गोमंतकातील मूर्ती, शिलालेख इत्यादींचा संग्रह करण्यात येत आहे. सेंट कॅजेटनचा कॉन्वेंट हा रोममधील सेंट पीटर ब्राझीलिकाच्या धर्तीवर व कोरिंथियन शैलीने बांधण्यात आला आहे. सेंट मोनिकाचा कॉन्वेंट ही गोवा शहरातील सर्वात उंच इमारत होय. ती आधीच उंचवट्यावर बांधलेली आहे. तिला तीन मजले असून सर्वात वरच्या गॅलरीतून भोवतालचा बराच भाग दृष्टीपथात येतो. या कॉन्वेंटला तट व बुरुज होते. ते आता कोसळले आहेत. याच्या भिंतीवर बायबलमधील प्रसंगांची उठावाची रंगीत चित्रे आहेत.

## पट्टदकल

कर्नाक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील प्राचीन मंदिराच्या वास्तु शिल्प शैलीसाठी प्रसिद्ध असलेले एक स्थळ. चार बाजूंनी बांधलेल्या दगडी भिंतींच्या आत मुख्य शहर वसले असून पूर्व व पश्चिम बाजूस एक एक दरवाजा आहे. पूर्वी चालुक्यांच्या वेळी नगरच्या परिसरात असंख्य मंदिरे होती. त्यापैकी आता फक्त १० मंदिरे अवशिष्ट असून पूर्णत: सुस्थितीत एक दोन मंदिरेच आढळतात आणि विरुपाक्ष मंदिरातच फक्त पूजा अर्चा इ. विधी चालू आहेत. मात्र इतर भग्न मंदिरांचे अवशेष इतस्तत: विखुरलेले असून

कन्नड भाषते लिहिलेले अनेक शिलालाख तेथे सापडले.

अवशिष्ट मंदिरात पापनाथ हे सर्वात जुने व विरुपाक्ष हे नंतरचे मंदिर असून दोन्ही मंदिरे कलादृष्ट्या प्रेक्षणीय व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दक्षिण हिंदुस्थानात ख्यातनाम असणाऱ्या 'गोपुर' या वास्तुची सुरुवातही येथील देवळातून झाली असावी असे तज्ज्ञांचे मत आहे. कारण ज्याला 'आद्य अथवा गर्भ गोपुर' कल्पना म्हणता येईल त्याची रुपरेषा येथील विरुपाक्ष मंदिराच्या बांधणीत आढळते.

विरुपाक्ष आणि त्रैलोक्येश्वर ही मंदिरे दुसऱ्या विक्रमादित्याने आपल्या कांचीपुरम्वरील विजयाच्या स्मरणार्थ त्रैलोक्यमहादेवी या आपल्या राणीच्या आग्रहाखातर बांधली. त्रैलोक्येश्वर मंदिर आज अस्तित्वात नाही. तथापि 'विरुपाक्ष मंदिर' सुस्थितीत असून लोकेश्वर या शिवरुपाला ते प्रथम अर्पण केलेले असल्यामुळे लोकेश्वर या नावाने ते प्रथम प्रसिद्ध होते. सूत्रधारी गुंड या शिल्पीने ते त्रैलोक्यमहादेवीच्या लोकमहादेवी या भगिनीसाठी ते बांधले असा शिलालेखात उल्लेख आहे. पुढे त्याचे विरुपाक्ष हे नाव रुढ झाले.


या मंदिरात कन्नड भाषेत लिहिलेले १२ शिलालेख असून त्यातील एका शिलालेखात श्री गुण्डन अनिवारिताचारी या शिल्पीच्या गौरवार्थ दिलेल्या दानांचा व उपाधींचा उल्लेख आहे.

या मंदिरावर पल्लव वास्तुशिल्पशैलीचा प्रभाव आढळतो. विरुपाक्ष मंदिराचे गर्भगृह सभामंडपापासून वेगळे असून त्याला वेगळा प्रदक्षिणापथ आहे. नंदीमंडपात सोळा एकसंध नक्षीदार स्तंभ असून मंडप दगडी भिंतींनी वेष्टिलेला आहे. प्रकाशाकरता दगडी खिडक्या भिंतींतून काढल्या आहेत. येथे चैत्यगवाक्ष कल्पना सढळ प्रमाणात वापरलेली आढळते. शिखर चौकोनी मनोऱ्यासारखे असून एकावर एक अशा थरांनी ते बांधले आहे. नंदीमंडप मंडपापासून पूर्णत: वेगळा असूनही त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण बांधणीमुळे तो मंदिराचाच एक भाग वाटतो.

संकलन : सौ. मंजिरी दांडेकर
(कलाशिक्षिका)
डॉ.बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) ठाणे

संदर्भ ग्रंथ

- संस्कृति कोश
- विश्व कोश
- भारतीय कलेचा इतिहास - श्री. शहाणे



# भगवद् गीता - जशी आहे तशी

## (शब्दार्थ, अर्थ, तात्पर्यासह)

*गीतेवरील ग्रंथांविषयी श्रीमती आशा भिडे यांचा बराच अभ्यास आहे. अशाच एका ग्रंथाविषयी या लेखात*

*- संपादक*

भक्तीवेदात बुक ट्रस्ट, लॉस एँजिलिस -लंडन-स्टॉकहोम - सिडनी -हाँगकाँग-मुंबई या आंतरराष्ट्रीय संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. याच्या इंग्रजी व मराठी आवृत्तीचे (सुधारित व विस्तारित) अनुवादक रोहिणीकुमार दास आहेत. हे पुस्तक अरबी, चीनी, डच, फ्रेंच, जर्मन, इंग्रजी, इटालीयन, जपानी, पोर्तुगीज, स्पॅनीश, हिंदी, स्विडिश, बंगाली, गुजराथी, तामिळ तेलगु, मलयालम्, कन्नड, ओरिसा तसेच अन्य ४० हून अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे.

आकर्षक रंगीत मुखपृष्ठ, मजबूत पुठ्ठा बांधणी, तसेच मलपृष्ठावर स्वामी प्रभुपादांचे छायाचित्र आणि गीतेच्या या भाष्याची वैशिष्ट्ये दिली आहेत. अमेरिकेतील ९० टक्कयाहून अधिक विश्व विद्यालयात पाठ्यक्रमात निर्धारित, आतापर्यंत सहा कोटींहून अधिक प्रती प्रकाशित, देशविदेशांतील सुप्रसिद्ध विद्वानांद्वारे प्रशंसित, सोळा बहुरंगी चित्रासह मूळ श्लोक, शब्दार्थ, अनुवाद, संपूर्ण तात्पर्यासह आता मराठी वाचकाना उपलब्ध.

स्वामी प्रभुपाद हे वैदिक ज्ञानाचे अद्वितिय आचार्य आणि भगवान श्रीकृष्णाचे भक्त आहेत. गीतेची अनेक संस्करणे झाली परंतु त्यापासून मानव समाज कृष्णभावनाभावित होऊ शकला नाही. स्वामी प्रभुपादांच्या भाष्याने संपूर्ण विश्वात भगवत्प्रेमाची मंदाकिनी प्रवाहित होऊ लागली कारण त्यांनी गीतेला वैयक्तिक अर्थ न देता मूळ यथार्थ रूपातच सादर केली आहे. गीतेचे संपूर्ण संस्करण सर्वप्रथम १९७२ मध्ये प्रकाशित झाले. यापासून प्रेरणा घेऊन हजारो भ्रांत पाश्चात्त्य युवक युवतींनी यथार्थ वैदिक जीवन पद्धतीचा स्वीकार केला. तसेच कोट्यावधी लोक भक्तीमध्ये संलग्न झालेले आहेत.

अनुक्रमणिकेत पार्श्वभूमी, मनोगत, उपोद्घात असून त्यानंतर अठरा अध्याय व शेवटी लेखक परिचय, ग्रंथसूची, विशेष शब्दावली, श्लोकानुक्रमणिका दिली आहे. ६१५ पृष्ठसंख्या असलेला हा ग्रंथ प्रथम प्रसिद्ध झाला तेव्हा पृष्ठसंख्या चारशेपेक्षा कमी होती. त्यावेळी पुस्तकात चित्रे नव्हती आणि मूळ श्लोकांचे विवरण नव्हते. परंतु ग्रंथाची मागणी फार वाढली तेव्हा ते सुधारित आणि विस्तारित रुपात प्रकाशित झाले.

मनोगतात स्वामी प्रभुपाद पुढे म्हणतात की आमचे हे कृष्ण भावनामृत आंदोलन अत्यंत शुद्ध स्वरुपाचे, ऐतिहासिक दृष्ट्या अधिकृत, स्वाभाविक आणि दिव्य आहे कारण ते 'भगवद्गीता - जशी आहे तशी' यावर आधारलेले आहे. हे आंदोलन विश्वातील, विशेष करून तरुण पिढीत सर्वात लोकप्रिय होत आहे. अमेरिकेत याचा प्रारंभ मी केला कारण भारतात अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, पण पाश्चात्त्यांनी 'गीता' डोक्यावर घेतल्यावर मग आम्ही त्यांचे अनुकरण करतो व स्वत:ला धन्य मानतो. या आंदोलनाला पाश्चात्त्यांमुळे 'हरे कृष्ण हरे रामा' आंदोलनही म्हटले जाते. पण आंदोलनाचे मूळ जनक भगवान श्रीकृष्ण आहेत. गुरुशिष्य परंपरेद्वारे मानव समाजात चालू राहिले आहे. याचे सारे श्रेय ते त्यांचे अध्यात्मिक गुरु ॐ विष्णुपाद परमहंस परिव्राजकाचार्य १०८ श्री श्रीमद् भक्तिसिद्धांत सरस्वती गोस्वामी महाराज प्रभुपाद यांना देतात. त्यांचे स्वत:चे श्रेय असेल तर हेच की भगवद्गीता

कोणतीही भेसळ न करता जशी आहे तशी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लोक त्याचा अभ्यास करून जास्तीत जास्त फायदा उठवतील आणि जर एक मनुष्य देखील भगवंताचा विशुद्ध भक्त झाला तर आमचा प्रयत्न यशस्वी झाला असे आम्ही समजू.

उपोद्घातात आपल्या अध्यात्मिक गुरूंना, ज्यांनी प्रकाशमय ज्ञानाने दृष्टी प्रदान केली त्यांना लेखकाने सादर प्रणाम करून प्रस्तुत आवृत्तीबद्दल जी (Bhagavad-Gita As it is) चे भाषांतर आहे त्याचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे. भगवद्गीतेचा मूळ आशय खुद्द भगवद्गीतेतच सांगितला आहे जसे एखादे औषध त्यावरील सूचनेनुसार अथवा डॉक्टरने सांगितल्याप्रमाणेच घ्यावे लागते ते (स्वत:च्या किंवा इतरांच्या सांगण्याप्रमाणे घेता येत नाही.) तसे घेतले तरच त्याचा उपयोग होतो. तसेच गीता प्रत्यक्ष स्वयं भगवान श्रीकृष्णांनी सांगितली आहे म्हणून आपण भगवद्गीतेला भगवंतानी ज्या स्वरूपात, जशी सांगितली आहे त्या स्वरुपात स्वीकारली पाहिजे. गीतेवर अनेक भाष्ये लिहिली गेली आहेत पण त्यात लेखकांनी इतरांची व स्वत:ची मते मांडली आहेत. आम्ही मात्र गीता जशी आहे तशीच लोकांसमोर ठेवली आहे. त्यामुळे अमेरिकेतच नव्हे तर भारतातसुद्धा जिला पूर्णपणे अधिकृत म्हणता येईल अशी गीतेची एकही आवृत्ती नाही.



एकं शास्त्रं देवकीपुत्रगीतम्
एको देवो देवकीपुत्र एव ।
एको मन्त्रस्तस्य नामानियानि
कर्माप्येकं तस्य देवस्य सेवा ॥ (गीता महात्म्य ७)

वर्तमान काळात लोक एकच शास्त्र, एकच परमेश्वर, एकच धर्म आणि एकच व्यवसाय असण्यासाठी अत्यंत उत्सुक आहेत. म्हणनू अखिल विश्वाकरिता भगवद्गीता हे एकच शास्त्र असावे, श्रीकृष्ण हे एकच परमेश्वर असावेत. एकच मन्त्र, एकच प्रार्थना असावी आणि ती म्हणजे त्यांच्या पवित्र नामाचा जप -

हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥

सर्वांसाठी एकच कर्म असावे व ते म्हणजे भगवंताची भक्तिमय सेवा.

प्रस्तुत भगवद्गीता जशी आहे तशी गुरुशिष्य परंपरेद्वारा प्राप्त झाली आहे. हे या ग्रंथाचे विशेष अप्रुप आहे.

एवं परम्पराप्राप्तम् इमम् राजर्षयो विदु: (भगवद्गीता ४:२) श्रीकृष्णापासून चालू झालेली जी गुरुशिष्य परंपरा त्यांनी दाखवली आहे त्याच ३१ वे गुरु भक्तिसिद्धांत सरस्वती व त्यांचे शिष्य प्रस्तुत पुस्तकाचे मूळ लेखक ए.सी. भक्तिवेदान्त स्वामी प्रभुपाद.

यानंतर गीतेचे अठरा अध्याय मूळ श्लोक, शब्दार्थ, श्लोकाचे भाषांतर आणि विस्तृत तात्पर्यासहित दिले आहेत. उदाहरणादाखल ११ व्या अध्यायातील (विश्वरूपदर्शनयोग) ११ व्या श्लोकाचे भाषांतर व तात्पर्य पुढे देत आहे.

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥ ११.११

अर्जुनाने या विश्वरूपात असंख्य मुखे, असंख्य नेत्र, असंख्य अद्भुत दृश्ये पाहिली. हे रूप अनेक अलौकिक अलंकारानी विभूषित झालेले आणि अनेक दिव्य शस्त्रांनी सज्ज झालेले होते. या विश्वरूपाने दिव्य वस्त्रे आणि माळा

धारण केल्या होत्या आणि अनेक दिव्य सुगंधी द्रव्यांचा त्यांच्या शरीराला लेप दिला होता. विश्वरुपाच्या बाबतीत सर्वच अद्‌भुत तेजस्वी, अनंत आणि सर्वव्यापी होते. तात्पर्य - या श्लोकांमध्ये वारंवार योजलेल्या अनेक या शब्दाद्वारे दर्शविण्यात आले आहे की, अर्जुन पहात असलेल्या विश्वरूपाला संख्यातीत कर, चरण, मुखे आणि इतर रुपे होती. त्याची ही रुपे विश्वभर पसरलेली होती; परंतु भगवंताच्या कृपेमुळे बसल्याजागीच ती रुपे अर्जुनाने पाहिली. श्रीकृष्णांच्या अचिंत्य शक्तीचा हा प्रभाव आहे.

प्रस्तुत लेखक स्वामी प्रभुपाद हे श्रीकृष्णापासून चालत आलेल्या गुरुशिष्य परंपरेतील आहेत. त्यामुळे त्यांचा थोडासा परिचय करून घेणे आवश्यक आहे.

जन्म सन १८९६ कलकत्यात झाला. त्यांचे गुरु भक्तिसिद्धान्त सरस्वती ठाकूर याची भेट कलकत्यातच १९२२ साली झाली.

सन १९३३ अलाहाबाद येथे त्यांच्याकडून दीक्षा ग्रहण करून ते त्यांचे अधिकृत शिष्य झाले.

पहिल्याच भेटीत वैदिक ज्ञान इंग्रजीतून प्रसारित करण्याची गुरूकडून विनंती.

त्यापुढील काळात स्वामी प्रभुपादांनी भगवद्‌गीतेवर टीका लिहिली.

गौडीय मठसंस्थेच्या कार्याला हातभार आणि १९४४ साली त्यांनी स्वबळावर एक इंग्रजी पाक्षिक चालू केले. त्याचे संपादक, लेखक व वितरकही ते स्वत:च होते. त्यासाठी अथम परिश्रम घेतले. आजमितीला त्याचे प्रकाशन पाश्चात्त्य देशात त्यांचे अनुयायी करीत असून ते एकोणीस भाषांतून उपलब्ध आहे.

गौडीय वैष्णव सोसायटीकडून १९४७ साली त्यांना 'भक्तिवेदांत' हा किताब दिला गेला.

१९५० साली गृहस्थाश्रमाचा त्याग. 'वानप्रस्थाश्रम' स्वीकारला. श्रीधाम वृंदावनात निवास. जीवनातील महत्त्वाचे कार्य श्रीमद्‌भागवतावर टीकेसहित भाषांतर करण्यास येथील श्रीराधा दामोदर मंदिरात सुरुवात. येथेच त्यांनी 'इजी जर्नी टू अदर प्लॅनेट' हे पुस्तकही लिहिले. १९६५ साली गुरुची इच्छा पूर्ण करण्यासाठी अमेरिकेत आले. भारतीय तत्त्वज्ञान व भारतीय धर्मसंस्कृतीवर जवळजवळ साठ पुस्तके लिहिली.

१९६५ ला न्यूयॉर्कला आले तेव्हा पूर्णपणे निष्कांचन होते. एक वर्षाच्या कठीण परिश्रमानंतर १९६६ साली आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाची स्थापना केली.

१४ नोव्हेंबर १९७७ साली तिरोभाव (निर्वाण) त्यापूर्वीच त्यांनी स्थापित केलेल्या संस्थेची जगभर भरभराट होऊन शेकडो मंदिरे, गुरुकुले, शैक्षणिक केंद्रे, कृषिसमाज उदयाला आले.

श्रीधाम मायापूर हे केंद्र नियोजित अध्यात्मिक नगराची उभारणी ही महत्त्वाकांक्षी योजना पूर्ण व्हायला अजूनही एक दशकाचा कालावधी लागेल. श्रीधाम वृंदावन येथे भव्य श्रीकृष्ण बलराम मंदिर तसेच भव्य आंतरराष्ट्रीय अतिथीगृह आहे. त्याचप्रमाणे मुंबईतही विशाल मंदिर व सांस्कृतिक शिक्षण केंद्र आहे. भारतात महत्त्वाच्या ठिकाणीही अशी केंद्रे स्थापण्याचे कार्य चालू आहे.

श्रील प्रभुपादांची सर्वात महत्त्वाची देणगी म्हणजे त्यांचे ग्रंथ. १९७२ साली त्यांच्या ग्रंथांचे प्रकाशन करणारा एक ट्रस्ट स्थापन करण्यात आला. 'भक्तिवेदात बुक ट्रस्ट' ही प्रकाशन संस्था आज भारतीय धार्मिक तत्त्वज्ञान विषयावरील पुस्तके प्रसिद्ध करणारी जगातील सर्वात मोठी प्रकाशन संस्था आहे.

प्रस्तुत भगवद्‌गीता - जशी आहे तशी गुरुशिष्य परंपरेद्वारे प्राप्त झाली आहे हे याचे वैशिष्ट्य आहे. गीतेच्या

अभ्यासकांना या ग्रंथाचा निश्चितच खूप उपयोगी होईल. गीतेच्या श्लोकातील सर्वच संस्कृत शब्दांचे अर्थ, श्लोकाचा अर्थ व तात्पर्य यात सविस्तर विवेचनासह दिले आहे. त्यामुळे सामान्यांना सुद्धा त्याचा फायदा होऊ शकेल. 'गीता' समजण्यास कोणतीच अडचण या ग्रंथामुळे येऊ शकणार नाही. उपोद्घातात संपूर्ण गीतेचा आढावा घेण्यात आला आहे. सोळा आकर्षक रंगीत चित्रे भगवद्गीतेचे तरंग उलगडून दाखवणारी आहेत. प्रभुपादांनी प्रस्तुत ग्रंथात स्पष्ट केले आहे की, मनुष्य आपल्या जीवन व्यवसायात संलग्न राहून सुद्धा गीतेचा आदर्श श्रोता, अर्जुनाप्रमाणे भगवत्परायण जीवन कंठू शकतो. तेव्हा म्हणा 'हरे कृष्ण'.

**भगवद्गीता - जशी आहे तशी**

ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद

प्रकाशक - भक्तिवेदांत बुक ट्रस्ट,

हरे कृष्ण धाम, मुंबई - ४९.

पृष्ठे ६२३

मूल्य -दिलेले नाही.

**आशा भिडे**

बी/१, विजय अपार्टमेंटस्,

'आराधना' टॉकिजजवळ, ठाणे (प.) - ४०० ६०२.

दूरध्वनी : २५४१ ०१४०

दिशा

नियमित वाचा

श्रीमती आशा भिडे,

सप्रेम नमस्कार,

माझ्या पुतण्याबरोबर (विनायक पारनाईक) 'सांगे गीता' हे पुस्तक इकडे मिळाले. यूरोप ट्रीपसाठी तो इकडे आला होता. त्याच्याबरोबरच हे पत्र पाठवत आहे.

गेल्या १५ वर्षात दादांच्या (पांडुरंगशास्त्री आठवले) स्वाध्याय परिवारात मन रमल्याने गीतेविषयी विलक्षण आवड निर्माण झाली आहे. गीतेवर वेगवेगळ्या लेखकांचे विचार व्यक्त होणारी बरीच पुस्तके वाचायचा नाद लागला आहे. दादा आठवले, प.वि.वर्तक, शंकर अभ्यंकर, ओशो, सर्वपल्ली राधाकृष्णन्, अनंतराव आठवले, विनोबा, प्रो.खैरे इत्यादींची पुस्तके वाचली. दादा सांगतात की, गीता हा मोठा सागर आहे, जेवढं खोल जाऊ तेवढे सुंदर मोती मिळतात. तुमचं पुस्तकही असाच एक मोठा 'मोती' वाटला. तुमचा अभ्यास खूप चांगला आहे. त्यामुळे स्पष्ट करताना सुलभता जाणवते. नवीन गीताभ्यासू लोकांना तुमच्या प्रवचनातून नक्कीच खूप लाभ होत असेल. तुमच्या या प्रवचनांना खूप यश येवो ही मनापासून प्रार्थना. पुस्तक वाचल्यानंतर काही गोष्टी सुचवाव्याशा वाटल्या ते स्पष्ट करतो - मी पण एक गीतेचा अभ्यासू म्हणूनच काही सुचवायची माझी पातळी अभ्यासूचीच आहे - मित्र म्हणून वाचावं आणि स्वीकारार्ह असेल तेवढंच घ्यावं.

तुमच्या प्रवचनांच्या टिपण्यावर पुस्तक लिहिलं गेलय असं वाटतं. प्रवचनाची भाषा, त्यावेळचं वातावरण अधिक प्रेक्षकांना घेऊन घेण्यासारखी असते. सद्यस्थितीतील दृष्टांत त्यात येतात. तेव्हा ते योग्य वाटतात... पुस्तकात ते अनुचित वाटतात. (अध्याय २, पान १७ 'मदर इंडीया'विषयी, अध्याय १२, पान १३३ - शिवसेनाविषयी उल्लेख) हे पुस्तकात नसावेत असं वाटलं. गीता प्रवचनानंतर त्याच विषयांवर प्रेक्षकांशी संवाद होत असल्यास खूपच छान.. इकडे कोणत्याही विषयावर अशा प्रकारचा संवाद (किंवा Workshop) झाल्यावर प्रेक्षकांना त्या विषयावर अभ्यास करण्याची वृत्ती निर्माण होते. तुमचा एवढा अभ्यास करून केलेली प्रवचने नुसती ऐकायची नाही तर त्यावर आणखी अभ्यास करण्याची - ऐकणाऱ्या १०० पैकी एकाने जरी तयारी दाखवली तर ते सार्थक होईल.. असो.

माझा अभ्यास उरलेल्या आयुष्यभर चालू राहील. मी Medical Doctor आहे (सध्या Retired) पेशंट बघताना कित्येक वेळा गीतेवरील विचार माझ्या कामातून आचरणात आले. देवावर अजिबात विश्वास नसणाऱ्या इंग्लीश पेशंटना देवावरची श्रद्धा सुचवली. शारीरिक रोगाबरोबर मनाची पण अस्वस्थता कमी करण्यासाठी श्रद्धा शिकवली.. योगेश्वर कृष्णाने सांगितलेले विचार आचरणात आणण्याचा छोटासा प्रयास.. असो.

गीतेच्या अभ्यासाने मनाची शांती तुम्हाला सतत लाभो ही प्रार्थना. अनेक शुभेच्छा!

- डॉ. विजय पारनाईक

'राधविंद', ३१ वेस्टबॉर्न अॅव्हेन्यू,

हॉवर्ड हिल, बिरमिंगहाम बी ३४ ६ ए.एन.

# उर्मिला एक उपेक्षित व्यक्तिमत्त्व

*या लेखात लक्ष्मणाची पत्नी उर्मिला हिच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. - संपादक*

दरवर्षी चैत्र शुद्ध नवमीला रामजन्माचा उत्सव होतो. त्यावेळी राममंदिरात व इतरही ठिकाणी भजने, कीर्तने होताता किंवा रामायणासारख्या महान ग्रंथातील व्यक्तिरेखांवर आपले काही अभिप्राय, मत अशाविषयी चर्चा होते. मला वाटते रामायणातील मुख्य व्यक्तिरेखा श्रीराम हा सर्वगुणसंपन्न आहे. किंबहुना श्रीरामांचे हे अंतःकरण अत्यंत शुद्ध आहे हे आपल्याला श्रीरामांच्या राज्यभिषेकाच्या वेळी जेव्हा दशरथ राजा म्हणजे श्रीरामांचे वडील त्यांना कैकयीच्या महालात बोलवून घेतात तेव्हा राज्याभिषेकापूर्वी वडील दशरथ व माता कैकेयी अशा उभयतांनी मिळून त्याला अर्शिवाद देण्याची इच्छा असेल असे श्रीरामप्रभूंच्या मनात आले. कारण त्यांना आपली माता कैकेयी हिच्याबद्दल दृढ विश्वास होता. व तितकेच श्रीरामचंद्राचे आपल्या कैकेयी मातेवर उत्कट प्रेम होते. जेव्हा श्रीरामांनी राज्य सोडून चौदा वर्षे वनवासाला पाठविण्याची आज्ञा कैकेयीने दिली. तेव्हा रामावाचून दुसरा कोणी असता तर रागावला असता, सापत्न मातेला उलटून बोलला असता किंबहुना सापत्न मातेची आज्ञा पाळावयाला लावणाऱ्या पित्याची त्याने निर्भत्सना केली असती. परंतु यापैकी काहीही न करता श्रीरामांनी मातापित्याला वंदन करून वनवासाला जाण्याचे ठरविले.

श्रीरामानंतर सीतामाईच्या व्यक्तिरेखेबद्दलही आदरानेच बोलावे लागेल. कारण 'अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा पंचकनाम् स्मरेन, नित्यम् महापातकनाशनम्।' अशा या पाच पुण्यवान स्रियांचे स्मरण केल्यानंतर महापापाचा सुद्धा नाश होतो. सीता ही जनकराजाची कन्या. बालपणापासून अत्यंत ऐश्वर्यात वाढलेली व विवाहानंतरही अयोध्येचा भावी राजा, श्रीराम याची पत्नी असून सुद्धा पतीबरोबर चौदा वर्षे खडतर अशा वनवासात रहावयाला निघाली. यावरूनच तिचा त्याग दिसून येतो. जानकीच्या विवाहाच्या वेळी तिच्या



पित्याने म्हणजेच जनकराजानी धनुर्भंगाचा पण भावी जामाताच्या, पराक्रमी परीक्षा पहाण्यासाठीच लावलेला होता. अशा या पराक्रमी श्रीरामाने खडतर वनवासात पत्नीचे रक्षण करता येत नाही म्हणून जर तिला स्वतःबरोबर नेले नाही तर श्रीरामाच्या पराक्रमाविषयी शंका उत्पन्न होईल व ते सासरच्या व माहेरच्या दोन्ही कुलांना लाच्छनास्पद ठरेल. असे विचार मांडून सीतेने श्रीरामाला त्याच्याबरोबर वनात नेण्यास भाग पाडले. पुढेही सीतेला रावणाने पळवून नेल्यानंतर ती महा बलाढ्य आणि तितक्याच कठोर हृदयी सम्राट रावणाच्या कचाट्यात अत्यंत एकाकी व असहाय्य अवस्थेत सापडली होती. तरीसुद्धा अत्यंत धैर्याने तिने रावणाचा धिःकार करुन अव्हेर केला. निर्भय आणि समर्थ मनच संरक्षण क्षम बनू शकते. म्हणून भारतीय स्त्रियांच्या मनावर हे सीतेचे संस्कार व्हायला हवेत. लक्ष्मणाला वनात पाठविण्यास सुमित्रा तयार झाली. त्यामुळे गृहकलह टाळण्यात ती यशस्वी झाली. कारण लक्ष्मण हा महाकोपिष्ट होता व त्याला आवरण्यासाठी फक्त रामच योग्य होता. तिने लक्ष्मणाला वनांत जाताना श्रीरामाला वडील मानून व सीतामाईला मातेप्रमाणे मानून त्यांची सेवा करण्याचा अतिशय मौल्यवान उपदेश केला. यातच सुमीत्रेचे मोठेपण दिसून येते. सुमित्रा सुद्धा राणी होती व रामानंतर तिचा मुलगा लक्ष्मण त्याचा राज्यावर अधिकार असून सुद्धा कौटुंबिक

स्वास्थ्य बिघडू नये म्हणून तिने प्रयत्न केले.

रामायणातील सर्वच व्यक्तिरेखा आपआपल्या परीने सशक्त आहेत. शबरी हे सुद्धा रामायणातील एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. शबरीच्या विवाह समारंभाला अनेक शेळ्यांना मारून त्यांची पाहुण्यांना मेजवानी करावयाची होती. हे पाहून तिचे मन कळवळले. व इतक्या गरीब जीवांची हत्या आपल्यामुळे होणार असेल तर लग्न न झालेलेच बरे म्हणून ती घरांतून निघून गेली व पुढे तिने मातंग ऋषींचे तापसी जीवनाचे शिष्यत्व संपादन केले. पुढे श्रीरामांनी तिचा उद्धार केला. या शबरीच्या उदाहरणावरून आज सामाजिक व सरकारी पातळीवरून दलित समाजाच्या उत्कर्षाचे प्रयत्न होतात. परंतु त्यांना केवळ आर्थिक मदत न देता त्यांच्यावर सुसंस्कार केले पाहिजेत.



तरच त्यांचा उत्कर्ष होऊ शकेल. तसेच रामायणातल्या हनुमंतासारख्या सशक्त व्यक्तिमत्वालाही ऋषींच्या शापामुळे आपल्या पराक्रमाचा विसर पडला होता. परंतु त्याची अस्मिता-जागृत केल्यानंतर त्याने सीता ही लंकेने अत्यंत कडक पहाऱ्यांत असल्याचा शोध लावून तिच्यापर्यंत पोचण्याचा महापराक्रम केला. याप्रमाणेच साधारण पाऊणशे वर्षांपूर्वी भारतीयांना आपण इंग्रजापासून स्वातंत्र्य मिळवून ते टिकवूही शकतो. या पराक्रमाचा पूर्णपणे विसर पडलेला होता. तसेच आपली पूर्वज अत्यंत त्यागी, प्रखर बुद्धीमत्ता असलेले, राष्ट्रभिमाने होते. या तेजस्वी इतिहासाचे यथातथ्य ज्ञान विद्यार्थ्यांना न होऊ देण्याचे निकाराचे प्रयत्न



चालले होते. अशा वेळेला लो. टिळकांसारख्या महान राष्ट्रभिमानी पुरुषाने देशातील जनतेची अस्मिता फुलविण्याचे व पराक्रमाची आठवण करून देण्याचे आटोकाट प्रयत्न केले व आपल्या 'केसरी' या वर्तमानपत्रावर दोन भक्ष्यावर झडप घालणाऱ्या वनराजाचे चित्र काढून मृतवत् झालेल्या समाजाने मेंढ्यांसारखे नेभळट न वागता सिंहाच्या छाव्याप्रमाणे पराक्रमी बना असा संदेश दिला. अशा प्रमाणे रामायणातील अनेक प्रसंग आपल्याला आदर्शभूत ठरले आहेत. रामायणातील प्रत्येक व्यक्तिरेखा सशक्त असून तिच्यापासून आपण अनेक प्रकारे बोध घेऊ शकतो. भाऊ असावा तर लक्ष्मणासारखा. संकल्पना लक्ष्मणाने एवढी साकार केली आहे. आयुष्यभर स्वतःच्या सुखदुःखांचा यत्किंचित विचार न करता त्याने भावाकरिता त्याग केला. भरताने देखील राज्याचा लोभ न ठेवता चौदा वर्षे रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्याच्या नावाने राज्यकारभार पाहिला. राम वनवासात असल्याने भरत नंदीग्रामी पर्णकुटीत रहात होता. तसेच कंदमुळांचे सेवन करून रामाचे जे कर्तव्य त्याच्यावर सोपवले होते ते कर्तव्य निष्ठेने पार पाडीत होता. अशी त्यागी वृत्ती असणाऱ्या भरताच्या तुलनेत आजचे मंत्री, उपमंत्री वगैरे किती हीन पातळीवर येऊन पोचले आहेत याची खंत वाटते. परंतु या सर्व व्यक्तिमधून व्यक्तिरेखांमधून मला उर्मिला हे रामायणातील उपेक्षित व्यक्तिमत्त्व आहे असे वाटते. कारण कैकेयीने रामप्रभूंसारख्या अत्यंत सच्छील व गुणसंपन्न व्यक्तिला स्वतःच्या मुलाला राज्य मिळावे या हव्यासाने १४ वर्षे वनवासात पाठविले. सीतामाई ही साहजीकच पत्नीव्रताला जागून त्याच्यासह वनवासात गेली. परंतु लक्ष्मण हा भाऊ असून स्वतः विवाहित असून आपल्या प्रेमळ, सुस्वरूप पत्नीला सोडून वनवासात गेला. अशा वेळी उर्मिलाचा त्याग हा सर्वांत महान आहे. कारण लक्ष्मणाला किंवा उर्मिलाला कैकेयीने वनवासात पाठविले नव्हते. व अशा तरूण पत्नीला चौदा वर्षे अयोध्येत ठेवून

लक्ष्मणाने खूपच अन्याय केला आहे. आपल्या सध्याच्या सामाजिक परिस्थितीत उर्मिलाचा महान त्याग उठून दिसतो. सध्या आपल्या समाजाची कुटुंबव्यवस्था पाहिली की मनाला बधिरपणा येतो. याच्याउलट पाश्चिमात्य लोकांना आपली संस्कृती आवडायला लागली आहे. कारण त्यांच्याकडील कुटुंबव्यवस्था घटस्फोटांमुळे मोडकळीस आली आहे. तर आपल्याकडे समाजात स्थैर्य आहे. हल्ली आपल्या समाजावर पाश्चिमात्य रूढींचा एवढा जबरदस्त पगडा बसला आहे की, त्यामुळे घरातील वडील माणसे, आई वडील यांच्याविषयी आदराची भावना तर दूरच राहिली आहे. व 'हम दो हमारे दो' पेक्षा 'हम दो हमारा एक' इतकी संकुचित वृत्ती बळावली आहे. त्यामुळे विवाहानंतर व्यक्तिस्वातंत्र्याच्या हव्यासामुळे आपली चिमणी पाखरे पाळणाघरातही ठेवायला लागतात. परंतु सासूसासरे, दीरजाऊ यांच्यात एकत्र रहाणे पसंत नसते. एकत्र कुटुंबपद्धतीचे काही फायदे व काही तोटे ही असतात. परंतु प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. परंतु फायदे जास्त आहेत. अशा सध्याच्या कौटुंबिक परिस्थितीकडे पाहिले असता उर्मिलाच्या त्यागाची कशाची तुलनाच करवत नाही. आपल्या सावत्र सासूच्या आज्ञेनुसार श्रीराम व सीतामाई यांना वनवासात जाणे भाग पडले. परंतु केवळ बंधूप्रेमामुळे उर्मिलाच्या तरूण पती लक्ष्मण हा आपल्या तरूण पत्नीला विरहाचे चटके सोसायला लावतो. विरोधाभासामुळे उर्मिलाचा त्याग महान आहे. म्हणून रामायणातील सर्व व्यक्तिरेखांचा आदर राखून सुद्धा उर्मिलाला त्रिवार वंदन करावेसे वाटते.

**सौ. मालती देवधर**
कलाविहार, प्रशांतनगर, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : २५४० ३४६०

## प्रशिक्षित ग्रंथपालाची भूमिका महत्त्वाची

सध्याच्या स्पर्धात्मक युगात ज्ञान संपादनेला आलेले अनन्य साधारण महत्व लक्षात घेता शास्त्रोक्त पद्धतीने चालणाऱ्या ग्रंथालयाची आणि प्रशिक्षित ग्रंथपालाची मागणी वाढणार आहे असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

ठाण्याच्या बांदोडकर महाविद्यालयात एम्.लिब.च्या मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे तीन दिवसांचे शिबीर अलिकडेच आयोजित करण्यात आले होते.

नुकताच या शिबिराचा समारोप झाला. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ विभागीय वरिष्ठ अधिकारी श्री. भालेराव आणि पुण्याचे डॉ. पानगे व प्रा. रामदास उपस्थित होते.

या शिबिरात २४ मुलांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमास रुपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. कर्णिक, वाशी महाविद्यालयाचे ग्रंथपाल थोरात, ठाण्याच्या बांदोडकर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या अकोलकर यांनी भेट दिली. पाहुण्यांचा सत्कार बांदोडकर महाविद्यालयाचे मोहन पाठक यांनी केला. यावेळी मुलांना सहभागपत्रे देण्यात आली.

# मराठी सिनेमा बदलतोय...

*ठाण्यातील समर्थ सेवकमंडळाच्या नि. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेत यंदा पारितोषिक प्राप्त ठरलेले एक भाषण.*
*- संपादक*

माननीय परीक्षक व मित्र हो,

परवा कॉलेजमधून घरी गेले. नेहमी हसतमुखाने माझे स्वागत करणारी आई आज मात्र आपल्याच विचारात होती. मी तिच्याजवळ गेले व म्हणाले की, काय झालाय आई, एवढा काय विचार करतेस ? भानावर येताच आई म्हणाली, नेहा सातच्या आत घरात पहा, नक्की पहा. मी तिटकाऱ्याच्या स्वरात आईला म्हटले, ' हे बघ आई मराठी सिनेमा सोडून बोल बाई. आई म्हणाली की नाही, तू आधी बघ, मग ठरव. अग मराठी सिनेमा बदलतोय !

आईचे हे म्हणणे विचार करायला लावणारे होते. खरच मराठी माणूस बदलतोय ? मराठी सिनेमा बदलतोय? हो, तर मग कसा आहे हा बदल ? हा बदल सुखद आहे, सकारात्मक आहे. आशावादी आहे हे मला ७च्या आत घरात पाहिल्यावर कळले.

नेहमीप्रमाणे चित्रपटासाठी आसुललेली मी त्या दिवशी काहीश्या नाराजीनेच ७च्या आत घरात गेले. पिक्चर पाहून बाहेर आले, तेव्हा माझ्या मनात प्रश्नांचे काहूर माजले होते. थोडक्यात, मी अंतर्मुख झाले होते. एखादी कलाकृती पाहून जर प्रेक्षक अंतर्मुख झाला तर ते त्या कलाकृतीचे यश असते, त्याची ताकद असते. ती ताकद मराठी चित्रपटांना पुन्हा मिळाली आहे याची मला त्या दिवशी खात्री पटली. मराठी सिनेमा बदलतोय ! हा बदल तुम्ही आम्ही, प्रत्येक मराठी माणसाने खुल्या दिलाने स्विकारला आहे.



चित्रपट ! समाजात निर्माण होणरे प्रश्न जनतेसमोर मांडण्याचे साधन म्हणजे चित्रपट ! मानवी स्वभावाचे अचूक वर्णन करण्याचे साधन म्हणजे चित्रपट ! समाजाला कणखर बनवणारी ताकद, समाजाला शक्तिशाली बनवण्याचे शास्त्र म्हणजे चित्रपट !

हे चित्रपट, त्यांचे निर्माते या मायावी दुनियेतील जादूगारच आहेत. पहा ना, ही निर्माती मंडळी ठरवले तर खलनायक घडवू शकतात, ठरवले नेता बनवू शकतात, ठरवले संत घडवू शकतात आणि मनात आणले तर एक सामान्य माणूस ही घडवू शकतात. ही सर्व मंडळी, अस्सल जादूगार आहेत कारण ते जे दाखवतात, जे सांगतात तसे आपण वागतो, करतो. याचा प्रत्यय आजपर्यंत समाज घेत आला आहे.

असो, मराठी भाषा. 'अमृतातेही पैजा जिंके' अशी रसाळ भाषा. आज मला मी मराठी आहे याचा अभिमान आहे. मराठी चित्रपटसृष्टीचा अभिमान असण्यात मोठा वाटा आहे. या मराठी चित्रपटसृष्टीला उज्वल, दिव्य, सोनेरी असा इतिहास लाभला आहे. कोणतेही विकसित तंत्र नसताना, परदेशी चित्रीकरण नसताना, रंग नसताना केवळ कसलेल्या अभिनयाच्या जोरावर मराठी कलाकारांनी चित्रपटसृष्टी घडवली, रंगवली, नावारूपास आणली. व्ही. शांताराम, सुलोचना, भालजी पेंढारकर, राजा परांजपे

असे अगणिक गुणवान कलावंत या इतिहासाचे शिल्पकार आहेत.

'प्रभात रंगमंदीर' तर या उज्वल इतिहासाचे साक्षीदार आहे. मग प्रश्न असा येतो की मराठी चित्रपटसृष्टीला बदलाची गरज का भासावी ? का झाला हा बदल ? कोणी केला हा बदल?

'अशी ही बनवाबनवी' हा चित्रपट आठवा ! जागेची टंचाई ! खरतर हा गंभीर विषय पण तोच विनोदी पद्धतीने मांडला गेला होता. मला सांगा, जर आपल्याला सवत आली तर काय होईल परिस्थिती आपली. पण त्या परिस्थितीतही धीटाईने सामोरी गेलेली सवत माझी लाडकी चित्रपटातील नायिका आठवा.

मग प्रश्न येतोच कुठे ? मी सांगते. माहेरची साडी, कूंकू, अगदी अलीकडचा चालु नवरा भोळी बायको याच्यातील काही सारख्या गोष्टी एकत्र करून मी तुम्हाला एक गोष्ट सांगते, दागिन्यांनी नटलेली, नवारी साडी नेसलेली नायिका, तुळशी वृंदावनाचे औक्षण वगैरे वगैरे सर्व काही आलबेल. मग जुने शत्रुत्व निघते. नायिका विधवा, मग दुसऱ्या नायकाचे आगमन, मारामारी पुन्हा शेवट गोड. हे सर्वच तुमच्या आमच्या ओळखीचे झाले होते. हे सर्व एकत्र करून मी ही एक चित्रपट बनवू शकते म्हणजे मराठी चित्रपटातील एकसूरीपणा हे बदलाचे प्रमुख कारण ठरले.

मंडळी, मी एक बंगाली चित्रपट पाहिला. त्यातील नायिका उशीला अभ्रे घालता घालता नायकाशी महत्वाचे बोलत असते. अशा सहज अभिनयाचा आपल्या कलाकारांना विसर पडला होता. जुळ्या बहिणी, गुप्त धन, सासू-सून अशा ठराविक विषयांच्या साच्यात मराठी चित्रपटसृष्टी अडकून पडली होती. जस एखाद्या कारखान्यातून १० एकाच आकाराच्या, रंगाच्या बाहुल्या बाहेर याव्यात ना तसे मराठी चित्रपटांचे झाले होते. थिएटर वर आलेल्या अशा अनेक चित्रपटांकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली. कारण काळ बदलला, लोकांची विचारधारा बदलली.

मध्यंतरीच्या काळातले चित्रपट पाहून मला वाटायचे की मराठी प्रेक्षकाचे बौद्धिक वय अजून १३ वर्षेच आहे. त्याला अजून मारामारीचे चित्रपट आवडतात. नायकाने नायिकेला घोड्यावरून पळवले की तो अजूनही टाळ्या वाजवतो. पण माझा अंदाज चुकला होता.

अनेक कलाप्रेमी निर्माते ही चित्रपटसृष्टी तारायला पुढे झाले.

मंडळी, चित्रपट बदलला म्हणजे काय झाले हो ? वेशभूषा बदलली, कलाकार बदलले. नाही ज्या कथेवर आधारीत चित्रपट बनतो ती कथा बदलली. त्यातून मांडली जाणारी तत्त्व बदलली. त्यातून मांडलेले विचार वेगळ्या घाटणीचे होते.

ज्या विषयांवर बोलायचे आजपर्यंत समाजाने टाळले त्याच विषयांवर चित्रपट निर्माण झाले. ज्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत यशाचा एक नवा अध्याय सुरु केला.

या बदलाची दणदणीत सुरुवात झाली ती अमोल पालेकरांच्या 'बिनधास्त' या चित्रपटाने ! नायिकाप्रधान असूनही प्रेक्षकांनी हा चित्रपट अक्षरशः डोक्यावर घेतला.

त्यानंतर धमाल मस्ती, मजा असणारा व अत्यंत देखणा असा चित्रपट आला तो म्हणजे '१०वी फ' लहान मुलांचे साजेसे विचार तितकीच निरागस वृत्ती, या कृतीला तितक्याच नव्या पण सामान्य चेहऱ्यांची जोड दिल्याने सुमित्रा भाव्यांचा '१०वी फ' चा वर्ग चांगलाच भाव खाऊन गेला.

मराठी चित्रपटाला जाताना मोठा रुमाल घेऊन जायचा व पुष्कळ रडायचा या संकल्पनेला या दोन चित्रपटांनी धक्का दिला. त्यानंतर एड्सवर आधारीत 'मला जगायचय',

स्किझोफ्रेनिया या मानसिक रोगावर आधारीत 'देवराई', स्त्रियांच्या अत्याचाराला वाचा फोडणारा 'नॉट ओन्ली....' असे अनेक ज्वलंत विषय ही प्रेक्षकांनी स्विकारले.

आजोबा व नातू यांच्या निराळ्या, निष्पाप नात्यावर आधारीत 'श्वास' तर अद्वितीय आहे. 'श्वास' अद्वितीय आहे कारण त्यातून समाजाला नवी दिशा मिळाली आहे. आपल्या आयुष्यात आता कायमचा अंधार येणार हे धीटाईने परशुराम स्विकारतो. आज या धीटाईची समाजाला गरज आहे. आपल्या नातवाच्या जास्तीत जास्त इच्छा पूर्ण करणारे आजोबा पाहिले की मन गलबलते. आजचे 'श्वास'चे यश अपूर्व आहे. याच 'श्वास' ने ऑस्करचा दरवाजा ठोठावला आहे.

चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन ही लोकांची मानसिकता आता बदलली आहे. मनोरंजनाबरोबर येणाऱ्या लोकशिक्षणाचे, लोकजागृतीचे महत्त्व आता प्रेक्षकांना पटले आहे.

अहो अडचणी, संकटे कोणावर येत नाहीत. मार्शल फोक म्हणतात-

"Don't tell me a problem is diffcult one. If it were not diffcuilt it would not be a problem."

ह्याप्रमाणे आता सर्व काही सुरळित झाले आहे, होत आहे. आज आपण प्रत्येक गोष्टीत अगदी दिसण्यात, वागण्यात, रहाण्यात पाश्चात्यांची तुलना करतो. करतो ना? मग तशी तुलना चित्रपटांची व्हायाल हवी. ज्याला आपण Comparitiv Study म्हणतो तो व्हायला हवा. बदल ही इंग्रजी चित्रपटांची गरज आहे. त्यातील वेगळा पण अस्सल अभिनय, त्यातील वास्तवावर आधारीत कथा, नवीन तंत्र. हे सारे मराठी चित्रपटात यावे ही माझी तळमळ आहे.

मंडळी, मराठी सिनेमा बदलतोय. पण मला हे १००% मान्य नाही. ही एक प्रक्रिया आहे. ती पूर्ण झालेली नाही. ग्रामीण जनतेसाठी चित्रपट हे मनोरंजन व समाजप्रबोधनाचे साधन असते. आज ही असे अनेक ग्रामीण भाग आहेत, जिथे ज्ञानाचा दिवा लागलेला नाही. आज अनेक भागांत स्त्रियांचा छळ होत आहे, खून होतो. हे सार थांबायला हव. यात चित्रपटांचा मोठा वाटा आहे. तो त्यांना उचलायला हवा. ग्रामीण जनतेला एकत्र करून चित्रपटाचा हेतू स्पष्ट करावा. शेवटी आशा व सकारात्मक विचार आपल्या आहेत. शेवटी सर्व निर्मात्यांना, कलाकारांना, प्रेक्षकांनी एवढे सांगून मी आपला निरोप घेते.

*डिगो न अपने प्रण से तो*
*सबकुछ पा सकते हो प्यारे*
*तुम भी ऊँची उठ सकते हो*
*छु सकते हो नभ के तारे !*

धन्यवाद !

**नेहा उदय फडके**
११वी कला,
स. प. महाविद्यालय, पुणे.

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# 'मानवी आरोग्य' आणि 'आहारशास्त्र' या विषयावर ठाण्यात झालेली राष्ट्रीय परिषद

*बांदोडकर महाविद्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण परिषदेचा हा वृत्तांत. - संपादक*

भारत देश हा २०२० पर्यंत स्वावलंबी तसेच विकसित देश व्हावा हे स्वप्न आपले राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अनेक दिशांनी देश मार्गक्रमण करीत आहे. एखादा देश विकसित आहे की नाही हे ठरविण्याच्या अनेक कसोट्या आहेत. त्यातलीच एक कसोटी आहे "आरोग्य".

आरोग्य ह्या कसोटीचा भारतातील स्थितीसापेक्ष आलेख पाहिजे तेवढ्या उंचीवर नाही हे वास्तव आहे. आजच्या या प्रदुषणयुक्त आणि धकाधकीच्या जीवनात मानवी आरोग्य हे किती खालावलेले आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच. अनेक प्रकारचे नवनवीन आजार माणसाला जडले आहेत. प्रत्येक नागरिकाचे स्वास्थ्य, पोषण शास्त्रीय आहारतत्वाप्रमाणे असेल तर त्याची मन:शक्ती, क्रियाशक्ती चांगली राहते आणि हीच शक्ती देशाला अग्रस्थानी पोहोचवू शकते. या दृष्टीने विचार करून आमच्या बांदोडकर महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातर्फे डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय परिषद भरवली गेली.

राष्ट्रीय परिषद १२-१३ डिसेंबर २००४ या दोन दिवशी व्हीपीएम्. तंत्रनिकेतन कॉलेजच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. परिषदेचा विषय होता, 'मानवी आरोग्य आणि पोषण - जैवतंत्रज्ञान एक मार्ग' परिषदेमध्ये जैवतंत्रज्ञानातले राष्ट्रीय पातळीवरच्या अनेक थोर शास्त्रज्ञांनी उपस्थिती लावली. ह्या सर्व शास्त्रज्ञांनी जैवतंत्रज्ञान हे मानवी आरोग्य आणि पोषण सुधारण्यात कसे मोलाचे ठरू शकेल, आरोग्यक्रांती करू शकेल हे सर्व उपस्थितांना सांगितले. आलेल्या शास्त्रज्ञांनी आपले जीवन हे जैवतंत्रशाखासाठी अर्पण केले होते हे त्यांच्या संशोधनावरून प्रत्ययास आले.



उद्घाटन समारंभ-व्यासपीठावरील मंडळी
डॉ. पुळगांवकर, डॉ.सौ.सहा, डॉ.नागेश टेकाळे, श्री. करंदीकर, डॉ.बालगीर, डॉ.सापटणेकर, डॉ.आर.एन्.जोशी, डॉ.सौ. पेजावर

परिषदेचे उद्घाटन रविवारी दि. १२ डिसेंबर २००४ रोजी १० वाजता झाले. अध्यक्ष स्थानी मंडळाचे अध्यक्ष श्री.श्री. वि. करंदीकर होते. उद्घाटन हाफकीन इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. श्रीकांत सापटणेकर यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करून झाले. त्यांनी आपले विचार Bio-technology is neither a craze, nor is it a fashion. It is essentially application of body of knowledge from diverse fields of science that holds promise for a better, cleaner & lucrative future. ह्या शब्दांमध्ये व्यक्त केले. जैवतंत्रज्ञानाचे फायदे हे सर्वसामान्य जनतेपर्यंत

पोहोचले पाहिजेत पण दुर्दैवाने तसे अजूनपर्यंत तरी घडलेले नाही. म्हणून परिषदेचा विषय हा मानवी आरोग्य आणि पोषण हाच का ठरविला गेला. त्यामागची दोन कारणे आहेत. एक म्हणजे प्रथम सांगितल्याप्रमाणे तो महत्त्वाचा विषय असून तो भारताचा विकसित करण्यासाठी सिंहाचा वाटा उचलू शकेल. दुसरे म्हणजे वनस्पतिशास्त्र विभागाने ह्या विषयासंबंधी केलेले संशोधन ! हे संशोधन १९९१ पासून सुरू झाले आहे. त्यासाठी विभागाचे व्याख्याते डॉ. टेकाळे यांनी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण-आदिवासी भाग शोधक वृत्तीने अभ्यासला आहे. दुर्गम, ग्रामीण भागात जनतेचा आहार किती आणि कशाप्रकारचा असतो? कुपोषणाचा लहान मुलांवर होणारा परिणाम हे त्यांनी अनेक माध्यमातून सर्वांना दाखवून दिले आहे. डॉ. टेकाळे यांनी त्याविषयी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रबंध सादर केले आहेत.

**परिषदेची उद्दिष्ट्ये**

भारतातील ६०% ग्रामीण जनतेत अनेक प्रकारच्या समस्या आहेत. त्या म्हणजे दारिद्र्य, कुपोषण, लोकसंख्यावाढ इ. जैवतंत्रशास्त्राच्या आधारे ग्रामीण जनतेत समतोल आहार पुरविणे ही सध्याची मुलभूत गरज आहे. ह्या सर्व समस्यांचा विचार ह्या परिषदेमध्ये केला गेला. ह्या परिषदेने स्वत:ची काही प्रमुख उद्दिष्टे ठरविली होती ती पुढीलप्रमाणे -

जैवतंत्रशास्त्रामधली अद्ययावत माहिती व त्यातील सुधारणा ही मानवी आरोग्य आणि पोषण ह्यात किती फायदेशीर आहे हे येणाऱ्या सर्व शास्त्रज्ञ, तंत्रशास्त्रज्ञ, औषधशास्त्रज्ञ, शासकीय अधिकारी तसेच बिनसरकारी सामाजिक संस्था यांना जाणीव करून देणे. त्यांच्यातील माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी खुले व्यासपीठ तयार करणे. जेणेकरून त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होईल.

कृषीशास्त्र आपले उत्पादन वाढविण्यासाठी अनेक प्रकारची रसायने, नाशके वापरीत असते. त्यांचा नेमका परिणाम अन्नाच्या दर्जावर कोणता होतो त्याचे मूल्यांकन करणे. वस्तुत: त्यामुळे कोणत्या प्रकारचे आजार होतात ते पाहून ते न होण्यासाठी चांगली पोषण मूल्ये असलेला आहार ठरविणे.

तरुण शास्त्रज्ञांना त्यांना बुद्धिमतेच्या कक्षा रुंदाविण्यासाठी त्यांना ह्या क्षेत्रामध्ये संधी निर्माण करून देणे, त्यांना जैवतंत्रज्ञान, आरोग्य आणि पोषण ह्या क्षेत्रांमध्ये येण्यास प्रोत्साहन देणे.

ही परिषदेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी परिषदेमध्ये शास्त्रीय सत्रे (Scientific Session) आणि तोंडी सत्रे (Oral Session) आयोजित करण्यात आली होती. तसेच पोस्टर प्रेझेंटेशन सुद्धा ठेवण्यात आले होते.

१२ डिसेंबर २००४ रोजी उद्घाटनानंतर दोन शास्त्रीय तर एक तोंडी सत्र झाले. प्रत्येक सत्रास एक अध्यक्ष तसेच एक उपाध्यक्ष नेमले होते. पहिल्या सत्रात डॉ. आर.एन्. जोशी, कोल्हापूर यांनी परिषदेच्या मुख्य विषयावर आपले भाष्य व्यक्त केले. त्या दिवशी शास्त्रीय सत्रांमध्ये शास्त्रज्ञ डॉ. रामेश्वर शर्मा, हैदराबाद, डॉ. नेने, पुणे, डॉ. सौ. जीजीबाई, चेन्नई, डॉ. अप्पुराव, म्हैसूर इत्यादींनी विविध विषयांवर आपली संशोधनपर माहिती प्रदर्शित केली.

१३ डिसेंबर २००४ रोजी डॉ. व्ही.एन्.पवार, परभणी, डॉ. बलगीर, भुवनेश्वर, डॉ. रविशंकर म्हैसूर, डॉ. सौ. मुकुंदन, मुंबई, डॉ. सौ. सुब्बलक्ष्मी इ. शास्त्रज्ञांनी शास्त्रीय सभांमध्ये आपले संशोधन उपस्थितांना समजावून सांगितले. पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये सुमारे ५० जणांनी आपले पोस्टर सादर केले. प्रत्येक पोस्टरमधून काहीतरी नवीन बघायला, शिकायला मिळाले. पोस्टर प्रेझेंटेशन मधून विजेते काढण्यासाठी डॉ. भागवत, बी.ए.आर.सी. यांनी काम पाहिले. दोन्ही दिवशी ह्या सत्रांसाठी बॉटनीचे प्रा.

डॉ. कोलेट व प्रा. डॉ. सौ. शहा यांनी सुंदर संचालन केले. त्यांच्यातर्फे शास्त्रज्ञांच्या कार्याचा अहवाल सादर करून त्यांना शेवटी स्मृतिचिन्ह भेट देण्यात आले.

शास्त्रीय तसेच तोंडी सत्र माहितीपूर्ण सादर झाली. त्यातून परिषदेची प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला. त्याद्वारे जैवतंत्रज्ञान मानवी आरोग्य आणि आहार यामध्ये किती नेत्रदीपक प्रगती करू शकते हे सर्वांनी उपस्थितांना दाखवून दिले.




समारोप समारंभ
डॉ. टेकाळे, डॉ. संजय ओक, डॉ. नरेश चंद्र,
डॉ.सौ. पेजावर, डॉ. श्रीमती मुळगांवकर

सोमवारी १३ डिसेंबर २००४ रोजी संध्याकाळी ४ वाजता निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाचे प्रमुख पाहुणे बिर्ला कॉलेज, कल्याणचे डॉ. नरेश चंद्रा हे होते, तर सन्माननीय पाहुणे डॉ. संजय ओक, टी.एन्.मेडिकल कॉलेज, मुंबई हे होते. ह्या समारंभात डॉ. ओक यांचे अभ्यासपूर्ण पण खेळीमेळीचे वातावरण तयार करणारे भाषण सर्वांच्याच लक्षात राहिले. त्यानंतर डॉ. नरेश चंद्रा, डॉ. सौ. पेजावर, डॉ. सौ. मुळगांवकर व डॉ. टेकाळे यांची भाषणे झाली. परिषदेचे संयोजक सचिव डॉ. टेकाळे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यावेळेस सर्व उपस्थितांनी उभे राहून त्यांच्या अमोल कार्याला दाद दिली.

ह्या परिषदेचा लाभ सर्व पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी, शिष्यवृत्ती घेणारे संशोधक, शिक्षणक्षेत्रातील मान्यवर, सरकारी अधिकारी तसेच बिनसरकारी सामाजिक संस्था यांनी घेतला. ह्या सर्वांमुळे अप्रत्यक्षरित्या संपूर्ण जनतेने आरोग्य आणि पोषण सुधारण्यास हातभार लागेल. ग्रामीण जनतेला सामाजिक-आर्थिक मदत मिळेल हा त्या मागचा शुद्ध हेतू होता.

२०२० च्या स्वप्नातील भारत साकार करण्यासाठी ह्या राष्ट्रीय परिषदेचा नक्कीच उपयोग होईल. तो खारीचा वाटा आमच्या वनस्पतिशास्त्र विभागाने उचलला हे आमचे भाग्यच आहे ! ह्या परिषदेचा फायदा आमच्या कॉलेज विद्यार्थ्यांना सुद्धा झाला. अशा ह्या संपन्न झालेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे निमंत्रक कॉलेजच्या प्राचार्या डॉ.सौ. एम्.के.पेजावर, सहनिमंत्रक वनस्पतिशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सौ.एम्.एस्. मुळगांवकर आणि परिषदेचे संयोजक सचिव डॉ.एन्.एस्.टेकाळे हे होते. त्यांना मदत करण्यासाठी विभागातील इतर व्याख्याते डॉ. कोलेट, डॉ. सौ. शहा, डॉ. जमदाडे यांनी काम पाहिले. तसेच ह्या सर्वांना नॉन-टीचींग स्टाफ व तृतीय वर्ष (वनस्पतिशास्त्र) विद्यार्थ्यांनीसुद्धा भरपूर मदत केली.

**अमित रमेश भोईर,**
तृतीय वर्ष (वनस्पतिशास्त्र)
बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स, ठाणे

**नववर्ष मंगलमय हो**

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल

१. इ. ७वी मधील अपूर्णा गायकवाड हिस मारोतराव शिंदे जलतरण तलाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत रीले मध्ये सुवर्ण पदक व बॅकस्ट्रोक मधे रजत व फ्री स्टाईल मध्ये ताम्र पदक मिळाले.

२. श्रेयस पाठक इ. ८वी याने १४ वर्षाखालील टेबलटेनिस स्पर्धेत ठाणे जिल्ह्याचे नेतृत्व केले व त्यांच्या संघाला सुवर्ण पदक मिळाले.

३. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक प्रश्नांविषयी जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने शाळेच्या सांस्कृतिक विभागाने शाळेतील ४० मुलांच्या एका गटाला **'अमेय पालक संघटना'** ह्या संस्थेला भेट देण्यासाठी नेले होते. मिसेस नीता व मिसेस शर्मिला ह्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ ऑक्टोबर २००४ रोजी विद्यार्थी तेथे गेले व तेथील मुलांच्या समस्या जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्या मुलांना छोट्या छोट्या भेटी दिल्या व भविष्यातही त्यांना मदत करण्याचा निश्चय केला.

४. पूर्वी झालेल्या 'मेघा संस्कार वर्ग' चा मागोवा घेण्यासाठी मिसेस सुजाता भिडे यांनी १०वी च्या विद्यार्थ्यांना त्यांची एकाग्रता वाढावी व येणाऱ्या परीक्षेत त्यांना चांगले यश मिळावे म्हणून मार्गदर्शन केले.

५. 'एन्डूरन्स ग्रुप महाराष्ट्र टेबल टेनिस चॅम्पियनशिप' औरंगाबाद

- गौरी जोशी इ. ८वी च - ताम्र पदक आणि १७ वर्षाखालील मुलींच्या संघाची चॅम्पियनशिप.
- कारंजा येथे झालेल्या आंतरशालेय राज्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक आणि लखनौ येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड.

६. आमच्या शाळेच्या सायन्स प्रकल्पाची ( खाऱ्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग) राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. गोहती (आसाम) येथे **१७ डिसेंबर, २००४ ते ३१ डिसेंबर २००४** या कालावधीत गटप्रमुख **सोनिया कारापूरकर** हिने तेथे आपला प्रकल्प सादर केला.

| | |
|---|---|
| सोनिया कारापुरकर (गटप्रमुख) | इ. ९वी |
| रिचा टिपणीस | इ. ८वी |
| आदित्य कानविंदे | इ. ८वी |
| श्रीनिवास घरोटे | इ. ८वी |

मार्गदर्शन करणारे शिक्षक - सौ. पूर्णिमा साठे, सौ. नमिता जोशी

७. आमच्या शाळेतील इ. ९वी तील विद्यार्थी चि. विविक्तेश आगवान ह्याची राष्ट्रीय FIDE रेटींग प्रमाणे सर्वात लहान बुद्धीबळपटू म्हणून निवड झाली आहे. FIDE प्राप्त भारतात फक्त १७६० बुद्धीबळपटु आहेत. १८०० पासून रेटींगला सुरुवात होते आणि विविक्तेशचे रेटींग १९१८ असे आहे.

विविध राज्यातील बहारदार लोकनृत्ये

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर - प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन

डॉ. बेडेकर विद्यामंदिर ठाणेच्या प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ बुधवार दिनांक १५ डिसेंबर २००४ रोजी शाळेच्या विद्यालंकार सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिरोडकर विद्यालय, मुंबईचे शिक्षक तथा प्रसिद्ध बालनाट्य लेखक श्री. पांडुरंग कदू हे होते. तर वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष श्री. वि. करंदीकर यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मळेकर, पूर्व प्राथमिक

विभागाच्या प्रमुख सौ. विदुला वैद्य, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, वि. प्र. मंडळाचे पदाधिकारी मा. य. गोखले, दिलीप जोशी इत्यादि मान्यवर उपस्थित होते. चौथीत शिकणाऱ्या कु. तनीशा देसाई हिने खणखणीत आवाजात निवेदक म्हणून काम केले. ईशस्तवन व स्वागतगीत झाल्यानंतर मुख्याध्यापक श्रीमती मळेकरबाई यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सर्वांचे उचित असे स्वागत करण्यात आले.

रथचक्र, आले रे आले रंग आले, सूर्याची लेकरे इत्यादि अनेक बालनाट्य लिहिणाऱ्या व सूर्याची लेकरे या नाटकास १६ पुरस्कार प्राप्त झालेल्या नाटकाचे लेखक म्हणून श्री. पांडुरंग कद्रू यांचा परिचय करून देण्यात आला. त्यानंतर मळेकर बाईंनी वार्षिक अहवाल सादर केला. यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. कद्रू यांनी आपल्या रथचक्र या एकांकिका पुस्तकातील संक्षिप्त स्वरुपात सांगितली तसेच 'लीटल गीफ्ट' ही बोधप्रद कथाही विद्यार्थ्यांना सांगितली.

अध्यक्षीय भाषणात श्री. करंदीकर यांनी शिस्तबद्ध वागणुकीबद्दल व शांतपणे कार्यक्रम पाहिल्याबद्दल मुलांचे कौतुक करून त्यांना धन्यवाद दिले. पूर्वीसारखे शिक्षण आता राहिले नसून अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत. मुलांचा कल पाहून त्यानुसार त्याला शिक्षण द्यावे, मुलांवर चांगले लक्ष ठेवावे असे पालकांना त्यांनी आवाहन केले. त्यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे श्री. कद्रू, श्री. करंदीकर आणि मा. य. गोखले यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावर्षीच्या आदर्श शिक्षिका म्हणून सौ. रश्मी संदीप धर्माधिकारी यांचाही सत्कार करण्यात आला. सौ. घोरपडे यांनी सर्वांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक-रंजनात्मक कार्यक्रमात महाराष्ट्र, गोवा, तामिळ, गुजराथ, राजस्थान, आसाम, पंजाब या राज्यातील सुमारे १३ लोकनृत्ये त्यातील पोशाखांच्या वैशिष्ट्यासह मोठ्या बहादारपणे सादर करण्यात आली. यामध्ये १ली व २री च्या गटातील गुजराती लोकनृत्यास म्हणजे 'गरबा' ला तर ३री व ४थी च्या गटातील राजस्थानी लोकनृत्यास उत्कृष्ट कार्यक्रमाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. माध्यमिक शाळेतील हस्तकला शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर व पूर्व प्राथमिक शाळेतील शिक्षिका सौ. पूर्वा खरे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. सिध्दी शिंदे व मेस्त्री या मुलींना अभिनयाचे विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमास सेवानिवृत्त माजी मुख्याध्यापिका सौ. नलिनी जोशी, सौ. सुलभा दांडेकर, श्रीमती कंटक बाई, सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती विजया पंडितराव, अभ्यंकर, श्री. प्र ग. वैद्य आदि उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत म्हणून करण्यात आली.

- संकलीत

## अशी आहे मुंबई

क्षेत्रफळ : ४३७.७१ चौ. कि. मी.
लोकसंख्या : एक कोटी १९ लाख १४ हजार
लोकसंख्या घनता (दर चौ. कि. मी. ) ९८
धार्मिक बाहुल्य : हिंदु, मुस्लिम, पारशी, ख्रिश्चन
एकूण उत्पन्न : ७८ अब्ज ९ कोटी २८ लाख
महसुली उत्पन्न : तीन हजार ३१२ कोटी
करपात्र मालमत्ता : आठ अब्ज ९६ कोटी तीन लाख ७२ हजार ४५४ रुपये
रस्त्यांची लांबी : एक हजार ७६३ कि. मी.
वाहने : सात लाख • दुकाने : दोन लाख एक हजार ७००
पंचतारांकित हॉटेल : अठरा • चित्रपट गृहे : ३८६
अग्निशमन केंद्रे : २३
मान्यताप्राप्त शाळा : दोन हजार १२७
विमानतळ : छत्रपती शिवाजी विमानतळ (दोन टर्मिनल)
विमानतळ क्षेत्रफळ : अडीच मैल
मुंबई विद्यापीठ संलग्न महाविद्यालय : ३५४
रुग्णालये : १८१ स्मशान : १७५
उद्याने : ५०५ खेळाची मैदाने : २५१

# उल्हास खाडीतील प्रदुषण सद्यस्थिती व उपाय

बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागातील शिक्षक १९८० पासून ठाणे खाडीचा नियमित अभ्यास करीत आले आहेत. अलिकडेच ठाणे व उल्हास खाड्यांचा अभ्यास सप्टेंबर २००१ ते नोव्हेंबर २००२ दरम्यान करण्यात आला, ज्यासाठी मुंबई महानगर पालिका विभाग पर्यावरण सुधार समिती (MMR-EIS. C/O MMRDA) कडून अर्थसहाय्य घेण्यात आले होते. ह्या अभ्यासातील निरीक्षणे पूर्वी केलेल्या अभ्यासाच्या निरीक्षणांशी पडताळून पाहिली असता ठाणे खाडीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे आढळले त्याबाबतचे ठळक निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

## ठाणे खाडी :

१) पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायुची सरासरी २.५ मि.ग्रॅ. पेक्षा कमी झाली आहे. इतका कमी प्राणवायू वनस्पती व प्राण्यांसाठी घातक आहे.

२) पाण्यातील तरंगणाऱ्या घन कणांचे प्रमाण पूर्वीपेक्षा खूप वाढले आहे.

३) पाण्यातील पोषक द्रव्यांचे प्रमाण खूप अधिक आहे. तसेच चिखलात वनस्पतिज व प्राणिज कार्बनचे प्रमाण वाढले आहे.

४) ठाणे खाडीची क्षारता घटली आहे. सांडपाण्यात वाढ व भरतीच्या पाण्याला होणारा अडथळा यामुळे असे झाले असावे.

५) तरंगणाऱ्या सूक्ष्म जीवांचे प्रमाण पूर्वीपेक्षा घटले आहे जे रासायनिक प्रदूषण वाढल्याचे दर्शविते.

६) खाडीमधील चिखलात गाळाचे प्रमाण खूप वाढले आहे. ज्यामुळे तेथील झिंगे व निवटे हद्दपार झाले आहेत. तसेच झिंग्यांचे व माश्यांचे पुनरुत्पादन होईनासे झाले आहे.

७) चिखलात आढळणाऱ्या प्राण्यांच्या प्रकारात बदल होऊन प्रदुषण सहन करणाऱ्या प्राण्यांच्या संख्येत वाढ झाली आहे.

८) खाडीतील वरच्या भागात प्रदुषणामुळे मासे अजिबात येईनासे झाले आहेत. फक्त पावसाळ्यात प्रदुषके वाहून गेल्यावर मासे खाडीत येतात, अन्यथा ते फक्त खाडी मुखाकडे मिळतात.

९) खाडीच्या अजैविक (पाणी व माती) तसेच जैविक (सूक्ष्म वनस्पती व प्राणी, मासे, चिखलातील प्राणी इ.) घटकांमधील जड धातूंचे (जस्त, तांबे इ.) प्रमाण खूप वाढले आहे.

१०) आणखी काही वर्षात ठाणे खाडी मोहीम खाडीप्रमाणे दुर्गंधीयुक्त होण्याची शक्यता आहे.

११) खाडीलगतच्या खारफुटीच्या जंगलांची लक्षणीय घट झाली आहे.

## उल्हास नदी

उल्हास नदीमध्ये ठाणे खाडीप्रमाणेच बदल दिसतात. मात्र ते कल्याण ते मुंब्रा ह्या भागात अधिक प्रमाणात जाणवतात. ठाणे खाडीतील चिखलातील काही प्राणी उल्हास नदी मुखात वसतीसाठी आल्याचे आढळले. उल्हास नदीची स्थिती ठाणे खाडीच्या मानाने बरी आहे. परंतु हळूहळू ढासळत आहे.

(मलपृष्ठावर)